रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

• वर्ष १८ • अंक १३१
www.ramprahar.com

• शुक्रवार, २८ नोव्हेंबर २०२५ • पाने ८ • किंमत ₹२

## अंतरंग

रेशनच्या तांदळामध्ये अळ्या आणि उंदराच्या लेंड्या/२

रोह्यातील चोरीप्रकरणी आरोपी अटकेत/५

मेगा लिलावात दीप्ती ठरली सर्वात महागडी खेळाडू/८

## आधार कार्ड प्रमाणित बोगस जन्म-मृत्यू दाखले होणार रद्द



**मुंबई :** केवळ आधार कार्डाच्या आधारे दिलेले किंवा संशयास्पद वाटणारे जन्म-मृत्यूचे दाखले आणि नोंदी तत्काळ रद्द करा तसेच या प्रकरणी पोलिसात तक्रारी दाखल करण्याचे आदेश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल प्रशासनाला दिले आहेत. १६ मुद्द्यांच्या आधारे या दाखल्यांची तपासणी केली जाईल. यासाठी विशेष मेळाव्यांचे आयोजन करून प्रकरणे निकाली काढली जातील. ज्या प्रकरणांमध्ये केवळ आधार कार्डला पुरावा मानून जन्म मृत्यू दाखले दिले गेले आहेत, ते आदेश त्रुटीपूर्ण मानले जातील. अर्जातली माहिती आणि आधार कार्डवरील जन्मतारीख यामध्ये तफावत आढळली तर संबंधित व्यक्तीवर गुन्हा दाखल केला जाईल. ११ ऑगस्ट २०२३च्या सुधारणेनंतर नायब तहसीलदारांनी वितरीत केलेले जन्म-मृत्यू नोंदीचे आदेश परत घेण्याचे आणि रद्द करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# कर्जतमध्ये नवीन रेल्वेपुलासाठी पाठपुरावा करणार

## मंत्री आशिष शेलार यांची ग्वाही; महायुतीच्या विजयाचे आवाहन






**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतच्या चारफाटा येथे वाहतूक कोंडी होते. ती सुटावी म्हणून रेल्वेच्या नवीन पुलाची आवश्यकता आहे. त्यासाठी मी पाठपुरावा करीन. त्याचप्रमाणे कर्जतला फार मोठा सांस्कृतिक वारसा असून अनेक कलाकार या भागातून पुढे आले आहेत. म्हणूनच या भूमीत राम गणेश गडकरी नाट्यगृह उभारले जाईल, अशी ग्वाही राज्याचे सांस्कृतिकमंत्री तथा भाजपचे रायगड जिल्हा संपर्कमंत्री आशिष शेलार यांनी गुरुवारी (दि. २७) येथे बोलताना दिली.

कर्जत नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गुंडगे, कर्जत आणि दहिवली येथे भाजप, शिवसेना, आरपीआय महायुतीच्या प्रमुख कार्यकर्त्यांच्या बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी मंत्री आशिष शेलार मार्गदर्शन करीत होते.

या बैठकांना भाजपचे रायगड जिल्हा निवडणूक प्रभारी आमदार प्रशांत ठाकूर, स्थानिक आमदार महेंद्र थोरवे, माजी आमदार सुरेश लाड, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष भोईर, आरपीआय कोकण संघटक राहुल डाळिंबकर, भाजप विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष किरण ठाकरे, तानाजी चव्हाण, मंगेश म्हसकर, वसंत भोईर, दीपक बेहेरे, रमेश मुंढे, राजेश भगत, नरेश मसणे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंत्री शेलार भाषणात पुढे म्हणाले की, ये फेव्हिकल का जोड हैं तुटेगा नही. आमदार महेंद्र थोरवे आणि माजी आमदार सुरेश लाड ही जोडी एकत्र आल्याने कर्जतमध्ये विकासाचा गाडा वेगाने पुढे जाईल. येथील विरोधकांकडून काय अपेक्षा काय करू? ज्यांची आघाडीच अभद्र आहे, त्यांच्याविषयी काय बोलावे? कर्जतसाठी काही करण्याची इच्छा नसलेली ही त्यांची परिवर्तन आघाडी घरचे परिवर्तन करणारी आघाडी आहे. या ठिकाणी आमची नैसर्गिक युती सक्षम असून आरपीआयदेखील आमच्यासोबत पाठीशी ठाम आहेत. त्यामुळे जनताही महायुतीला साथ देईल.

आमदार महेंद्र थोरवे यांनी म्हटले की, आपण ऐतिहासिक विजयाकडे वाटचाल करीत असून विरोधकांची परिवर्तन आघाडी नसून परिवर्तन करण्याच्या वल्गना करणाऱ्यांना जनता त्यांची जागा दाखवून देईल. कर्जत शहरात विरोधाला विरोध करण्यासाठी उमेदवार दिले आहेत. ते उमेदवार फारसे शिक्षित नाहीत आणि त्यांचा उद्देश हा प्रामुख्याने आपल्या हाती नगर परिषदेच्या चाव्या असाव्यात हाच आहे, परंतु कर्जत आणि माथेरानमध्ये विकास काय असतो हे जनतेने पाहिले आहे आणि त्यामुळे मतदार हा कायम विकासाला साथ देतो हे या निवडणुकीतदेखील दिसून येईल.

सुरेश लाड यांचे शहराच्या विकासासाठी असलेले योगदान पाहता तुमची साथ पुरेशी आहे. तुम्ही आजारी असलात तरी आम्हाला नगर परिषद निवडणुकीसाठी तुमचा आशीर्वाद महत्त्वाचा आहे, असेही आमदार थोरवे यांनी सांगितले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी, महायुती बळकट आहे. त्यामुळे कर्जत नगर परिषदेत महायुतीचा विजय निश्चित आहे, असा विश्वास आपल्या भाषणात व्यक्त केला.

माजी आमदार लाड यांनी उपस्थितांचे स्वागत करून कर्जत शहरातील राष्ट्रीय महामार्ग, रस्त्यावरील अनेक पूल, रेल्वे उड्डाणपूल यांची कामे पूर्ण करावीत तसेच कर्जत शहर आणि पलीकडील भिसेगाव व गुंडगे यांना जोडण्याची गरज आहे, अशी गरज अधोरेखित केली.

या बैठकांना माजी नगराध्यक्ष शरद लाड, राजेश लाड, रजनी गायकवाड, नगराध्यक्षपदाच्या उमेदवार डॉ. स्वाती लाड, नगरसेवकपदाचे उमेदवार ॲड. संकेत भासे, कोयल कन्हेरीकर, विशाखा जिनगरे, रामदास गायकवाड, जान्हवी देवघरे, प्रकाश डेरवणकर, किशोर कदम, अरुणा वायकर, ज्ञानेश्वर करणूक, ॲड. हृषिकेश जोशी, सुचिता वांजळे, स्वामीनी मांजरे, गौरी जोशी, वैभव सुरावकर, सुनील गोगटे, आम्रपाली डाळिंबकर, वैशाली मोरे, रॉली पाल, विजय हजारे, कोमल म्हामुणकर, ॲड. नेहा पेंदे, भाजप महिला मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष प्रिया मुकादम, भाजप जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, वृषाली वाघमारे, कल्पना दास्ताने, मंगेश म्हस्कर, पनवेल शहराध्यक्ष सुमित झुंझारराव, कामोठे अध्यक्ष विकास घरत, माजी नगरसेवक विजय चिपळेकर माजी नगरसेविका दर्शना भोईर तसेच संध्या शारबिद्रे, सपना पाटील, शिल्पा म्हात्रे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना राज्य सरकारकडून दिलासा

### कृषी कर्जवसुलीला वर्षभराची स्थगिती



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देणारा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या निर्णयानुसार अतिवृष्टीग्रस्त आणि पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या सहकारी कर्जाचे पुनर्गठन तसेच शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस एका वर्षासाठी स्थगिती देण्यात आली आहे. सहकार विभागाने या संदर्भातील शासन निर्णय जारी केला.

जून ते सप्टेंबरदरम्यान राज्यातील अनेक भागात अतिवृष्टी व पुरामुळे मोठे नुकसान झाले. पिकांची हानी, पशुधनाची हानी, घरांची पडझड अशा गंभीर परिणामांचा सामना शेतकऱ्यांना करावा लागला. ही परिस्थिती दुष्काळसदृश घोषित करत शासनाने शेतकऱ्यांना ३२ हजार कोटींचे वशेष पॅकेजही जाहीर केले होते. हे पॅकेज जाहीर करताना कर्जाचे पुनर्गठन आणि कर्जवसुलीस स्थगिती देण्याचे सरकारने जाहीर केले होते. त्यानुसार हा निर्णय घेतला आहे.

अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधित तालुक्यातील सर्व गावातील बाधित शेतकऱ्यांच्या अल्पमुदत कर्जाचे मध्यम मुदत कर्जात रुपांतरण करण्यात येणार आहे. शेतीशी निगडीत कर्जवसुलीस स्थगितीबाबत राज्यस्तरीय बँकर्स समिती, राज्य सहकारी बँक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी आवश्यक कार्यवाही करावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

## मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा पुढे ढकलल्या

**मुंबई :** येथील विद्यापीठाच्या हिवाळी सत्र २०२५च्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. पुढील काही दिवसांमध्ये राज्यात नगर परिषदा आणि नगरपंचायतीच्या निवडणुका होणार आहेत. मुंबई विद्यापीठाचे कार्यक्षेत्र असलेल्या काही भागांमध्ये या निवडणुका होणार असल्याने मुंबई विद्यापीठाने हिवाळी सत्र २०२५च्या परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतले आहे. त्यानुसार १ ते ४ डिसेंबरदरम्यान होणाऱ्या सर्व पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षेच्या तारखा बदलल्या आहेत. विद्यार्थ्यांनी अद्ययावत वेळापत्रकाची नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## निवडक

### हाँगकाँगच्या आगीत ५५ जण मृत्युमुखी; अनेक लोक जखमी

**हाँगकाँग :** येथील वांग फुक कोर्ट या गगनचुंबी इमारतींच्या समुहाला लागलेल्या आगीत सुमारे दोन हजार सदनिका जळून खाक झाल्या आहेत. आतापर्यंत ५५ मृतदेह सापडले असून अद्याप २७९हून अधिक लोक बेपत्ता आहेत. या आगीत ७६ जण गंभीर जखमी आहेत, ज्यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे.

### मालिका गमावल्यानंतर कर्णधार ऋषभ पंतने मागितली माफी

**नवी दिल्ली :** भारताला दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी मालिकेत २-० असा पराभव स्वीकारावा लागल्यानंतर कर्णधाराची जबाबदारी सांभाळलेल्या ऋषभ पंत एक पोस्ट करत क्रिकेट चाहत्यांची माफी मागितली आहे. टीम इंडियाने कसोटी मालिकेत चांगली कामगिरी केली नाही हे मान्य करून पंतने आम्ही एक टीम आणि एक व्यक्ती म्हणून ताकदीने आणि चांगल्या प्रकारे पुनरागमन करण्यासाठी कष्ट घेऊ, असे म्हणत पाठिंब्यासाठी चाहत्यांचे आभार मानले आहेत.

# विरोधकांना जात, धर्मापलीकडे काही दिसत नाही!

## उरणमधील सभेत आमदार महेश बालदी यांचा जोरदार हल्लाबोल



**उरण : रामप्रहर वृत्त**

विरोधकांना जात, धर्म, भाषा, पंथ याच्या पलीकडे काही दिसत नाही, पण आमचे प्रेम हे येथील मातीशी आहे. आपल्याला उरणचा सर्वांगीण विकास करायचा आहे. सगळ्या समाजांच्या बंधू-भगिनींना सोबत घेऊन पुढे जायचे आहे. राज्य आणि केंद्र शासनाकडून जे जे येथे करता येईल ते करण्याची कटीबद्धता आमची आहे, असे प्रतिपादन आमदार महेश बालदी यांनी येथे केले.

उरण नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी भाजप महायुतीचा जोरदार प्रचार सुरू आहे. त्या पार्श्वभूमीवर उरणमधील मोरा येथे व्यापाऱ्यांसोबत संवाद साधण्यासाठी बुधवारी (दि. २६) प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी आमदार महेश बालदी यांनी विरोधकांवर हल्लाबोल करीत त्यांचा आपल्या खास शैलीत समाचार घेतला.

या सभेस भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, शहराध्यक्ष कौशिक शाह, हस्तीमल मेहता, रोशन मेहता, हितेश शाह, मनन पटेल, मनोहर सहथिया, नगराध्यक्षपदाच्या उमेदवार शोभा कोळी-शाह यांच्यासह नगरसेवकपदाचे उमेदवार, महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि व्यापारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



आपल्या भाषणात आमदार महेश बालदी म्हणाले की, स्वतःचे कर्तृत्व संपले की जात आठवते, पण विरोधकांनी कितीही ताकद लावली तरी उरणमध्ये भाजपने केलेल्या विकासकामांच्या जोरावर नगर परिषदेत सर्वच्या सर्व २१ उमेदवार बहुमताने विजयी होणार आहेत. जे केवळ व्हिडीओ काढून प्रचार करत आहेत ते ३ तारखेनंतर कुठेही दिसणार नाही.

नगरपालिका आमच्या वैभवाचे साधन नसून समाजसेवेची आलेली संधी आहे हे मानणारे भाजपचे उमेदवार आहेत. त्यामुळे या सर्व उमेदवारांना मोठ्या मताधिक्क्याने विजयी करा, असे आवाहन त्यांनी या वेळी केले.

## मुंबईत लोकलमधून पडून तरुणाचा मृत्यू; दुसरा गंभीर जखमी

**विरार : प्रतिनिधी**

मुंबईच्या लोकलमध्ये लटकून प्रवास करणे दोन तरुणांना महाग पडले आहे. या घटनेत एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला असून दुसरा गंभीर जखमी झाला आहे. हा अपघात गुरुवारी (दि. २७) सकाळी वसई आणि नायगाव रेल्वेस्थानकांदरम्यान झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार विरार रेल्वेस्थानकातून सकाळी ९ वाजून १० मिनिटांनी चर्चगेटकडे एक लोकल रवाना झाली. या लोकलच्या दरवाज्यात उभे राहून प्रतीश बाळाराम भोले आणि नानासाहेब मदने प्रवास करत होते. या वेळी तोल जाऊन दोघेही धावत्या गाडीतून खाली कोसळले. या दुर्घटनेत प्रतीश भोले याचा मृत्यू झाला, तर नानासाहेब मदने गंभीर जखमी झाला आहे. जखमी तरुणाला जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, तर दुसऱ्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी नेण्यात आला. या अपघातानंतर पश्चिम रेल्वेमार्गावर वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. रेल्वे पोलीस या घटनेचा अधिक तपास करीत आहेत.

## अर्बन बँक बुडवणाऱ्या आरोपीला मत मागण्याचा अधिकार नाही! -नरेन जाधव

**पेण : प्रतिनिधी**

पेण को-ऑपरेटीव्ह अर्बन बँकेत सुमारे ७५० कोटी रुपयांचा घोटाळा होऊन १५ वर्षे झाली. लाखो ठेवीदार आणि खातेदारांचे पैसे या बँक घोटाळ्यात बुडाले. तरीही या बँक घोटाळ्यातील मुख्य आरोपी शिशिर धारकर नगर परिषदेच्या निवडणुकीमध्ये आम्ही पेणकर विकास आघाडी आघाडीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार रिया धारकर आणि नगरसेवकपदाच्या उमेदवारांसाठी मतांचा जोगवा मागत फिरत आहेत, मात्र एवढा मोठा बँक घोटाळा करून लोकांचे पैसे बुडवणाऱ्या शिशिर धारकर यांना नागरिकांकडे मत मागण्याचा अधिकारच नाही, अशा शब्दांत पेण अर्बन बँक ठेवीदार संघर्ष समितीचे कार्याध्यक्ष नरेन जाधव यांनी गुरुवारी (दि. २७) पत्रकार परिषदेत हल्लाबोल केला.



पेण अर्बन बँक घोटाळ्यातील २५ आरोपींवर प्रत्येकी २३ कोटी ९० लाख रुपयांची सामूहिक व वैयक्तिक वसुलीची जबाबदारी सहकार आयुक्तांनी निश्चित केली आहे. (पान २ वर..)

## थंडी ओसरली, उकाडा वाढला!

**पुणे : प्रतिनिधी**

नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीलाच राज्यात थंडीची लाट जाणवू लागली होती, मात्र त्यानंतर थंडी हळूहळू ओसरू लागली आहे. सध्या कमाल तापमानातदेखील वाढ होत आहे. परिणामी राज्यात उन्हाचा चटका व उकाडा तापदायक ठरत आहे.

श्रीलंका आणि बंगालच्या उपसागरात तीव्र कमी दाबाचे क्षेत्र सक्रिय असून ही प्रणाली तामिळनाडू आणि पदुच्चेरीकडे येण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे बंगालच्या उपसागरात सेनयार चक्रीवादळ निर्माण झाले आहे. सध्या उत्तरेकडून येणारे थंड वाऱ्यांचे प्रवाह कमी झाले आहेत. त्यामुळे मागील आठवड्यातील तापमान २३ अंशावर गेले होते. आताही उकाड्यात वाढ झाली असून कमाल तापमान ३५ अंशापर्यंत गेले आहे.

# देशातील प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार देणारे संविधान भारतरत्न डॉ. बाबासाहेबांनी दिले

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे उद्गार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारताचे संविधान जगात अद्भूत आहे आणि देशातील प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार देणारे संविधान भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिले. त्यानंतर जगभरात या संविधानाचा गौरव केला जातोय, असे उद्गार आमदार प्रशांत ठाकूर यांनी काढले.

संविधान गौरव दिन आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे पनवेल शहराध्यक्ष निलेश सोनावणे यांनी येथील महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर नवीन पनवेलमधील के. आ. बांठिया विद्यालयात गुरुवारी (दि. २७) आयोजित केले होते. या शिबिरात आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते.




आज या संविधानाला ७५ वर्षे होत असून संविधानाच्या माध्यमातून देशातील प्रत्येक नागरिकाला पुढे जाण्याचे बळ दिले जात आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१५ साली संविधान दिन हा देशभरात साजरा केला पाहिजे अशी संकल्पना मांडली. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी देशाच्या विकासासाठी मोदीजींनी जे जे निर्णय घेतले त्यांना पाठिंबा दिला असल्याने आठवलेसाहेबांचेही या निमित्ताने आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणात आभार व्यक्त केले तसेच संविधान दिनानिमित्त निलेश सोनावणे व सहकाऱ्यांनी राबविलेल्या उपक्रमाचे कौतुक केले.

३६५ दिवस ऊन वारा पाऊस याची तमा न बाळगता आपले पनवेल शहर व परिसर स्वच्छ, सुंदर ठेवणाऱ्या महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांचे आरोग्य निरोगी रहावे याकरिता त्यांची वैद्यकीय तपासणी वेळेच्या वेळी होणे गरजेचे आहे, हा संकल्प मनाशी ठेवून या शिबिराचे आयोजन केले असल्याचे निलेश सोनावणे यांनी प्रास्ताविकात सांगितले.

या वेळी रिपाइंचे पनवेल महापालिका जिल्हा क्षेत्र अध्यक्ष प्रभाकर कांबळे, जिल्हा प्रवक्ते तथा पनवेल महापालिका जिल्हा क्षेत्र कार्याध्यक्ष मोहन गायकवाड, आधार हॉस्पिटलचे डॉ. संतोष पांढरे, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेवक गणेश कडू आदींनी मनोगत व्यक्त केले. (पान २ वर..)

## निवडक

### देवीचापाडा येथून एक जण बेपत्ता



**पनवेल :** देवीचापाडा येथून राहत्या घरातून कोणालाही काहीही न सांगता एक व्यक्ती कोठेतरी निघुन गेले ते घरी परत आली नाही. म्हणून ते हरविल्याची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. कैलास राजभर (वय ४२ रा. देवीचा पाडा), हे असून त्यांचा रंग-सावळा, बाधा-सडपातळ, चेहरा-उभट, नाक-टोकदार, केस काळे लहान, अंगात नेसुससे शर्ट व ग्रे पॅन्ट, काळे शुज आहे. या व्यक्तीबाबत कोणाला माहिती असल्यास त्यांनी तळोजा पोलीस ठाणे किंवा पो.हवा राजेंद्र साळुंखे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### सोन्याची चेन आणि पेंडण्टची चोरी

**पनवेल :** खारघर येथे रोलिंग लाऊड कॉन्सर्ट या कार्यक्रमात असताना अनोळखी व्यक्तीने सोन्याची चेन आणि पेंडण्ट जबरदस्तीने ओढून चोरी केल्याप्रकरणी आरोपीविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अद्वेद पिल्लाई हे मालाड येथे राहत असून, ते रोलिंग लाऊड कॉन्सर्ट या कार्यक्रमासाठी खारघर येथे आले होते. या वेळी त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन अज्ञाताने ओढून चोरी करून नेली तसेच ज्योतिरादित्य मोरे यांच्या गळ्यातील ११ ग्रामची चेन आणि पेंडण्ट अज्ञाताने चोरी केले. संवेद बलसारा याची १५ ग्राम वजनाची सोन्याची चेन चोरून नेली. तसेच समर्थ शेट्टी, हृदय नाईक, कौन्सिल रवी देसूल, यश देवरे यांच्या देखील गळ्यातील सोन्याची चेन असा एकूण १५ ते १६ लाखांचा सोन्याचा ऐवज चोरट्यांनी लांबवला.

### सोनसाखळीचोरांचा महिलेवर हल्ला

**पनवेल :** तळोजा परिसरात पायी चालणाऱ्या महिलेची सोनसाखळी दुचाकीवरून येणाऱ्या चोरट्यांनी महिलेवर हल्ला करून तिला फरफटवत नेत दागिने लुटल्याची धक्कादायक घटना घडली आहे. चोरट्यांच्या या हल्ल्यात महिला जखमी झाली आहे. या घटनेतील ४७ वर्षीय महिला घरी जात असताना दुचाकीवरून आलेल्या दोन चोरट्यांनी अचानक पायी चालत असलेल्या महिलेला लक्ष्य करत सोनसाखळी खेचण्याचा प्रयत्न केला. महिलेने विरोध केल्याने चोरट्यांनी सोनसाखळीला हिसकावले व ते पसार झाले.

### सोन्याच्या दागिन्यांची चोरी

**पनवेल :** आयेशा बेग या रोहिंजन गाव येथे राहत असून, त्यांनी कपाटातील ड्रॉव्हरमध्ये ठेवलेले दागिने घालण्यासाठी पाहिले असता त्यात दागिने नव्हते. दागिन्यांचा इतरत्र शोध घेतला मात्र सापडून आलेला नाही. त्यांच्या घराचा कडीकोयंडा किंवा दरवाज्याचा कोणताही भाग तुटला नसल्याचे निदर्शनास आले. आयेशा बेग यांचे ३२ तोळे वजनाच्या सोन्याच्या दागिन्यांची चोरी केल्याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. सोने चोरीच्या घटनांसह अन्य घरफोडीच्या घटनांमध्ये पनवेल, नवीन पनवेलमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे रहिवाशांमध्ये घबराट निर्माण झाली आहे. पोलिसांनी कारवाई करण्याची मागणी होत आहे.

### पनवेल शहर पोलीस सन्मानित

**पनवेल :** शहर पोलीस ठाण्यातील अधिकारी वर्गासह कर्मचाऱ्यांना पोलीस आयुक्तालय नवी मुंबई यांच्या वतीने सन्मानित करण्यात आले आहे. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या हस्ते पनवेल शहर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रज्ञा मुंढे, पोहवा माधव शेवाळे, मपोशी साधना पवार, पोना सम्राट डाकी, रवींद्र पारधी आदीनी आता पर्यंत केलेल्या कौतुकास्पद कामगिरीबद्दल त्यांना प्रोत्साहनपर प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले.



# शिवकर गावात साकारणार भव्य राम मंदिर

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते कामाचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील शिवकर गावामध्ये राम मंदिराच्या कामाचा शुभारंभ गुरुवारी (दि.२७) भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमाला भाजप तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, अनुसूचित जाती सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, उपसरपंच मोनिका पोपटा, सदस्य रवींद्र ढवळे, संतोष मते, प्रांजल पाटील, रितू पाटील, रेश्मा पाटील, गणपती देवस्थानचे अध्यक्ष गोपाळ पाटील, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, दत्तात्रेय ढवळे, गोमा ढवळे, चांगा ढवळे, बाळाराम ढवळे, बबन ढवळे, गोपीनाथ ढवळे, वामन ढवळे, तुकाराम तुपे, शंकर महाराज, रामदास ढवळे, गोटीराम ढवळे, वसंत ढवळे, हनुमान ढवळे, लहु ढवळे, राम पवार, जयदास ढवळे, रमेश ढवळे, निखिल चोरघे, अरविंद माळी, सागर ढवळे, राजकुमार ढवळे, चंद्रकांत ढवळे, प्रदीप ढवळे, मोहन पोपटा, तुकाराम टोपले, माया पाटील, तुकाराम पाटील, गणेश पाटील, लक्ष्मण कांबळे, रोशन तुपे, समिर पोपेटा, रोहित ढवळे, पोलीस पाटील मिलिंद पोपेटा, मीनाक्षी ढवळे, अंजली ढवळे, पूजा ढवळे, सरोज ढवळे, मनीषा ढवळे आदी उपस्थित होते.



# रोडपाली सिग्नलजवळ झालेल्या अपघातात लहान मुलाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील रोडपाली सिग्नल येथे आठ रस्ते एकमेकांना मिळत असल्याने सिग्नल सुटण्यापूर्वीच अनेक वाहनांची येथे स्पर्धा होते याच स्पर्धेतून एका बालकाला त्यांचे प्राण गमवावे लागले आहेत. अपघाताची ही गंभीर घटना रोडपाली सिग्नलवर घडली.

या भिषण अपघातामध्ये ट्रेलरच्या चाकाखाली नऊ वर्षांच्या बालकाचे डोके चिरडल्याने तो जागीच ठार झाला. वडीलांसोबत हा मुलगा स्कूटीवरून जात होता.

तळोजा फेज २ येथील शुभ इनक्लेव्ह या सोसायटीत राहणारे ४३ वर्षीय सुनील पाकळे हे त्यांचा मुलगा शार्विल याला घेऊन शाळेत सोडण्यासाठी स्कूटीवरून रोडपाली बाजूकडे जात असताना ही घटना घडली. नावडे उड्डाणपुल ओलांडल्यानंतर कासाडी नदीचा पुल ओलांडल्यानंतर ते रोडपाली सिग्नल अगोदर ३० फूट अंतरावर हा अपघात घडला. रोडपाली सिग्नल गाठण्याच्या धांदलीत भरधाव वेगाने चाललेल्या ट्रेलर चालकाने डाव्या बाजूकडे न पाहता स्कूटीला ठोकर दिली. या ठोकरीत स्कूटीवरून चाललेले बापलेक रस्त्यावर कोसळले. अपघातामध्ये स्कूटीला ठोकर लागल्याचे समजूनही ट्रेलर चालकाने त्याच्याजवळील ट्रेलर थांबवला नाही. त्याने अजून ट्रेलर दामटवला. या दरम्यान ट्रेलरचे मागील चाक बालक शर्विल याच्या डोक्यावरून गेले. गंभीर जखमी झालेला शर्विलच्या या अपघातामध्ये प्राण गेले. शर्विल हा दूसरीत शिकणारा बालक होता. त्याचे वडील स्वता स्कूलव्हॅन चालक आहेत. रोडपाली येथील सुनिल यांनी त्यांची व्हॅन उभी केल्यामुळे त्या व्हॅनपर्यंत शर्विलला घेऊन ते स्कूटीने जात होते.

या प्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात २२ वर्षीय ट्रेलरचालक राजकरण वर्मा याच्याविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला असून त्याला ताब्यात घेतले आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक तृप्ती शेळके अधिक तपास करीत आहेत.

# घरफोडी करणारे सराईत गुन्हेगार जेरबंद

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली वसाहतीस संपूर्ण महाराष्ट्रत वेगवेगळ्या ठिकाणी घरफोडी करणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना गुन्हे शाखा कक्ष ३ ने जेरबंद केल्याने मोठ्या प्रमाणात अनेक घरफोडीचे गुन्हे उघडकीस येण्यास मदत होणार आहे.

कळंबोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोडी झाल्याप्रकरणी गुन्हे शाखा कक्ष ३चे सहाय्यक पोलीस निरीक्षक नांदरे, पोलीस उपनिरीक्षक अभय शिंदे आणि पथक तांत्रिक तपास व गुप्तबातमीद्वारा आरोपींचा शोध घेत असताना त्यांना सराईत गुन्हेगार सलीम मोहम्मद शेख (वय ३७, रा. दापोली) व तौफिक मोहम्मद शेख (वय ३२, रा. चिकोडी, कर्नाटक) यांची माहिती मिळाल्याने त्यांना ताब्यात घेतले असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली असून त्यांच्याविरुद्ध मोठ्या प्रमाणात विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. याबाबत पुढील तपास कळंबोली पोलीस करीत आहेत.

# जुने फ्रीज विकत घेण्याच्या बहाण्याने ऑनलाईन फसवणूक

**पनवेल :** जुने फ्रिज विकत घेण्याचा बनाव करून खोटी माहिती देऊन वेगवेगळे स्कॅनर पाठवले आणि एक लाख १२ हजारांची ऑनलाईन फसवणुकीचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी अनोळखी व्यक्तीविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

रितिका अलुवालिया या कामोठे, सेक्टर ३४ येथे राहत असून, त्यांनी घरातील जुने फ्रिज विक्रीसाठी ओएलएक्स या सोशल मीडियावर टाकले. त्या वेळी त्यांना समोरील व्यक्तीने यांचे नाव संजय कुमार असून खारघर येथे फर्निचरचे दुकान असल्याचे सांगितले आणि क्यूआर कोड पाठवतो, गुगल पेमधून स्कॅन करा आणि तुम्हाला पाच रुपये येतील, असे सांगितले. ती प्रोसेस केल्यानंतर पाच रुपये त्यांच्या बँक खात्यात जमा झाले. पुन्हा समोरील व्यक्तीने १०० रुपये पाठवले. या वेळी पुन्हा एक स्कॅनर पाठवला. तो स्कॅन केला असता रितिका यांच्या आईच्या खात्यातून १४ हजार ५०० वजा झाले. त्यानंतर पुन्हा स्कॅन करा असे सांगितले असता, त्यांच्या आणि आईच्या खात्यातून एकूण एक लाख १२ हजार ३०० रुपये वजा झाले.

# मोरा येथे भाजप उमेदवारांची प्रचार रॅली

**उरण : वार्ताहर**

उरण नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ असल्याने उरण नगर परिषद हद्दीतील मोरा येथील प्रभाग क्रमांक १ मध्ये बुधवारी (दि. २६) भाजप उमेदवारांचा प्रचार रॅली काढण्यात आली होती.



यात भाजप महा युतीच्या नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार शोभा कोळी-शाह, नगरसेवक पदासाठी प्रभाग क्रमांक १ (अ) उमेदवार रजनी सुनील कोळी, प्रभाग क्रमांक.१ (ब) चे उमेदवार जयविन्द्र लक्ष्मण कोळी यांच्या सह शेकडो भाजप कार्यकर्ते प्रचार रॅलीत सहभागी झाले होते.

प्रचार रॅलीला सुरुवात साई बाबा मंदिर येथून सुरुवात झाली. पुढे गणपती मंदिर पर्यंत होती. या वेळी चेतन कोळी, अक्षय कोळी, विनायक कोळी, सुनील राज कोळी, सुनील कोळी, राजेश कोळी, मदन कोळी, सिद्धार्थ कोळी, जयराज कोळी, जयू कोळी, मालती कोळी, रोहिणी कोळी, माळी कोळी, अरविंद कोळी, गणेश कोळी, महेश कोळी, कविता कोळी, यांच्या सह शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले होते. प्रचार रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# पनवेल महापालिकेत प्राणी जन्म संनियंत्रण समितीची बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भटक्या श्वानांच्या समस्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या सुमोटो याचिका क्रमांक ०५/२०२५ अनुषंगाने राज्य शासनाने २४ नोव्हेंबर २०२५ रोजी सर्व महापालिकांना दिलेल्या निर्देशांनुसार पनवेल महापालिकेत प्राणी जन्म संनियंत्रण समितीची बैठक नुकतीच आयुक्त मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या बैठकीत प्राणी जन्म नियंत्रण, श्वानांचे लसीकरण, निर्बिजिकरण आणि नागरिकांच्या सहकार्याबाबत महत्त्वपूर्ण चर्चा करण्यात आली.

या वेळी उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. भगवान गीते, डॉ. मधुलिका लाड, पंचायत समितीचे पशुधन विकास अधिकारी डॉ. ए.बी.मारकवार, डॉ.एम.एम. मर्चंडे, आयबीएन संस्थेचे मुख्य शल्यचिकित्सक डॉ. एच.जी. घनवट उपस्थित होते.

महापालिकेच्या वतीने पशुवैद्यकीय विभागाच्या वतीने प्राणी जन्म नियंत्रण कार्यक्रम सन २०१८ पासून सुरु असून आतापर्यंत १२हजार७०० पेक्षा अधिक भटक्या श्वानांचे निर्बिजिकरण करण्यात आले आहे. तसेच झिरो-रेबीज निर्मूलन कार्यक्रम अंतर्गत श्वानांचे नियमित लसीकरण करण्यात येत असून, सन २०२५मध्ये १५हजार६७९ श्वानांना रेबीज प्रतिबंधात्मक लस देण्यात आली आहे. रेबीज विषयी जनजागृती करून जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत माहिती पोहचविण्याच्या दृष्टीने विविध कार्यक्रम राबविण्याबाबत आयुक्तांनी यावेळी सूचना दिल्या.

भटक्या श्वानांना योग्य व्यवस्थापनासाठी शेल्टर-निवाऱ्याची उभारणी जलद गतीने सुरू असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. हे निवारा केंद्र उभारल्यानंतर शाळा, रुग्णालये, रेल्वे स्टेशन, बस डेपो, क्रीडा संकुल आणि गर्दीच्या ठिकाणी आढळणारे भटके श्वान पकडून त्यांचे निर्बिजिकरण व लसीकरण करून त्यांना या सुरक्षित निवाऱ्यात ठेवण्याविषयीचे निर्देश आयुक्तांनी दिले.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार भटक्या श्वानांना खाऊ घालण्यासाठी जागा निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू असून, यासाठी पशुप्रेमींनी महानगरपालिका पशुवैद्यकीय विभागाकडे अर्ज करणे आवश्यक आहे. पालिकेने यादृष्टीने अर्जाचा नमुना उपलब्ध करून दिला आहे.

निश्चित केलेल्या 'फीडिंग स्पॉट' व्यतिरिक्त इतर ठिकाणी कुत्र्यांना खायला घालणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचेही बैठकीत स्पष्ट करण्यात आले. तसेच नागरिकांचा सहभाग वाढवण्यासाठी विशेष हेल्पलाईन क्रमांक विकसित करण्याबाबतही चर्चा झाली.

# प्रदूषणावर नियंत्रण ठेवा; पनवेल महापालिकेचे महामंडळाला पत्र

**खारघर : प्रतिनिधी**

नजीकच्या तळोजा आद्योगिक वसाहती मधुन होणाऱ्या वायु प्रदूषणामुळे खारघर, तळोजा कळंबोली आणि कामोठे वसाहतीत नागरिकांना प्रदूषणाला तोंड द्यावे लागत आहे. यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असुन याबाबत पनवेल महापालिकेने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला लेखी पत्र देत याबाबत उपाययोजना राबविण्याच्या सुचना केल्या आहेत.

२१ रोजी हे पत्र उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना पालिकेचे उपायुक्त स्वरूप खारगे यांनी लिहले आहे. पनवेल परिसरात खालावत चाललेली हवेची गुणवत्ता स्थानिक रहिवाशांसाठी गंभीर चिंतेचा विषय ठरत असल्याने नागरिकांकडून विविध माध्यमांद्वारे तक्रारी प्राप्त होत आहेत. तळोजा परिसरातील हवा प्रदूषणासाठी जबाबदार औद्योगिक युनिट्सची आपल्या कार्यालयामार्फत तपासणी होणे आवश्यक आहे. तळोजा परिसरातील औद्योगिक युनिट्सना वायू प्रदूषण प्रतिबंधात्मक उपाय अंमलबजावणी करन्याबाबत या पत्रात म्हटले आहे. त्याचप्रमाणे हवेमध्ये विविध रासायनिक घटक, धूर व तत्सम बाबींचे उत्सर्जन करणाऱ्या तसेच वायू प्रदूषण विषयक बाबींचे उल्लंघन करणाऱ्या उद्योगांवर आपल्या कार्यालयामार्फत कडक कारवाई करणे आवश्यक आहे असेही या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

# गव्हाण विद्यालयात संविधान दिन साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये बुधवारी (दि.२६) संविधान दिनानिमित्त भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले.



इयत्ता पाचवी क या वर्गाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ह्या कार्यक्रमात संविधानाच्या प्रतीसह भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, संस्थेच्या पिरकोन यथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाच्या शिक्षिका मिनल पाटील, दिपाली पाटील, जितेश भोईर, रवींद्र नागोठकर यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी गुरुकुल प्रमुख संदीप भोईर, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख संदिप उगले, ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे, राजेंद्र चौधरी, वर्गशिक्षिका संपदा म्हात्रे, इतर शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते. इयत्ता सातवी ब मधील सचिन देशमुख हा विद्यार्थी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या वेशभूषेत उपस्थित होता. एकूण ९२० विद्यार्थ्यांसह संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख हर्षाला पाटील तर आभार प्रदर्शन क्रीडाशिक्षक सुरेश पारखे यांनी केले.

दरम्यान, संविधान दिनाच्या पूर्व संध्येला मंगळवारी उलवे येथील संविधान महोत्सव समितीच्या वतीने विद्यालयात संविधानाचा जागर करण्यात आला.

# ओरायन मॉलमध्ये 'असंभव'चा विशेष प्रीमियर

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील एकमेव मॉल असलेल्या ओरायन मॉल मध्ये असंभव या मराठी चित्रपटाचे विशेष प्रीमियर मोठ्या उत्साहात झाले. या वेळी असंभव चित्रपटाची स्टारकास्टसह पनवेल शहरातील प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होती. मराठी अभिनेत्यांना पाहण्यासाठी शहरात मोठी गर्दी झाली होती.



ओरायन मॉलचे मालक चित्रपटाचे सहनिर्माते मंगेश परुळेकर, शहरातील प्रसिद्ध व्यावसायिक संजय पोतदार हे या चित्रपटाचे सहनिर्माते या वेळी उपस्थित होते. यांच्यासह अभिनेते सचित पाटील, पुष्कर क्षोत्री, मुक्ता बर्वे, नितीन वैद्य,तेजस देसाई,शर्मिष्ठा राऊत आदींसह या प्रीमियरला आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, भाजप नेते बाळासाहेब पाटील, माजी सभागृह नेते परेश ठाकुर, शिंदे सेनेचे नेते चंद्रशेखर सोमण, माजी नगरसेवक अनिल भगत, उद्योजक विजय लोखंडे आदींसह शहरातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

या वेळी पनवेलकरांसाठी असंभव चित्रपटाचे विशेष शोचेदेखील आयोजन करण्यात आले होते.या शोला उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला. चित्रपटाच्या स्टारकास्टने यावेळी उपस्थित नागरिकांशी संवाद साधला. या चित्रपाटाचा गोवा येथे होणाऱ्या इफ्फि २०२५ आंतराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी निवड झाल्यानेदेखील उपस्थितांनी चित्रपटाच्या स्टारकास्ट आणि निर्मात्यांचे अभिनंदन केले.

# सत्याग्रह महाविद्यालयाची खारघरमध्ये संविधान गौरव रॅली

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

राहुल शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सत्याग्रह महाविद्यालय, डॉ. जी. के. डोंगरगावकर विधी महाविद्यालय, सिद्धार्थ हायस्कूल, इन-लाइटन स्कूल, डॉ. जी. के. डोंगरगावकर इंटरनॅशनल स्कूल, अजिंठा स्कूल, सत्याग्रह अध्यापक महाविद्यालय यांच्या वतीने संविधान दिनी (दि.२६) उत्सव चौक ते सेंट्रल पार्क खारघर अशी सुमारे ३,००० पेक्षा अधिक विद्यार्थी-पालकांची भव्य संविधान गौरव रॅली काढण्यात आली.

प्रारंभी, संस्थेचे संस्थापक डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी उपस्थिताना संविधान उद्देशिकेची शपथ दिली.सत्याग्रह महाविद्यालय येथून सुरुवात झालेल्या रैलीचा समारोप येथील खारघर सेंट्रल पार्क येथे झाला. या रेलीत प्रा. रत्नमाला डोंगरगावकर, डॉ. प्रीती शर्मा, डॉ. निधी अग्रवाल, प्रा. अमरचंद हाडोळतीकर, प्राचार्या वनिता सूर्यवंशी, प्रा. नेहा राणे, सर्व शिक्षक, विद्यार्थी सहभागी झाले होते.



या वेळी प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर म्हणाले की, गेली २५ वर्षे आमची संस्था संविधान अभियान उपक्रम राबवत आहे. येत्या ३० नोव्हेंबर २०२५ रोजी संस्थेतील सर्व पालकांना भारताचे संविधान निःशुल्क डॉ. जी. के. डोंगरगावकर विधी महाविद्यालयाच्या वतीने प्रदान करण्यात येणार आह. तसेच ६ डिसेंबर पर्यंत संविधान साक्षरता साजरा केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## संपादकीय

# दुरुस्तीने दिलासा

राज्यातील महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने महापालिकांनी जारी केलेल्या प्रारूप मतदार यादीत चुका असल्यास त्या दुरुस्त करण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाने आता सर्व महापालिका आयुक्तांना दिले आहेत. राज्यभरातील २९ महापालिकांच्या निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने काही दिवसांपूर्वी जाहीर केला होता. त्यानंतर सदोष मतदारयाद्यांबाबत विरोधकांनीच नव्हे तर सत्ताधारी भारतीय जनता पक्षानेही आक्षेप घेतले. मतदार याद्यांमध्ये दुरुस्ती केल्याशिवाय निवडणुका घेऊ नयेत अशी मागणी भाजपने केली होती.

**अधिसूचित दिनांक म्हणून १ जुलै २०२५ ही तारीख निश्चित करण्यात आली असून त्या दिवशी अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार याद्या राज्यातील महापालिका निवडणुकीसाठी वापरण्यात येणार आहेत. या मतदारयाद्यांचे प्रभागनिहाय आणि मतदान केंद्रनिहाय विभाजन करून अंतिम यादी तयार करण्याची जबाबदारी संबंधित महापालिका आयुक्तांवर राज्य निवडणूक आयोगाने सोपवली आहे. त्यानुसार महापालिकांनी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध केल्या आहेत. निवडणुकीसाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या मतदार याद्यांच्या प्रारूपात चुका असल्याचा आक्षेप विरोधकांबरोबरच सत्ताधारी भाजपनेही घेतला होता. तर मुंबईतील एकूण २२७ प्रभागांमध्ये काही लाख नावे दुबार असल्याचे आढळून आले आहे असे मुंबई महापालिका प्रशासनानेच म्हटले. त्यापैकी काही नावे अनेक वेळा अनेक प्रभागांमध्ये असल्याचेही आढळून आले आहे. सर्वाधिक दुबार नावे ही वरळी विधानसभा मतदारसंघातील एका प्रभागात असल्याचे आढळून आले आहे. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी गुरुवारी २० नोव्हेंबरला मतदार यादी जाहीर करण्यात आली होती. या प्रारूप मतदार यादीवर २७ नोव्हेंबरपर्यंत हरकती व सूचना नोंदवण्यात येणार होत्या तर ५ डिसेंबरला अंतिम मतदार यादी जाहीर होणार होती. परंतु आता राज्य निवडणूक आयोगाने मतदान केंद्रनिहाय अंतिम मतदार याद्या जाहीर करण्यास १० दिवसांची तर हरकती व सूचनांसाठी सात दिवसांची मुदतवाढ दिली आहे. नव्या वेळापत्रकानुसार अंतिम मतदारयाद्या आता २२ डिसेंबरला जाहीर केल्या जातील. काही महापालिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर मतदारांची नावे चुकीच्या प्रभागात समाविष्ट झाल्याच्या तक्रारी राज्य निवडणूक आयोगाकडे आल्या आहेत. महापालिकांकडेही अशा तक्रारी येऊ शकतात. या तक्रारींनुसार संबंधित मतदारांच्या नावांची तपासणी करून ती योग्य प्रभागात समाविष्ट करण्यात यावीत आणि त्यानंतर अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात याव्यात असे स्पष्ट आदेश आयोगाने दिले आहेत. या आदेशांमुळे अशा मतदारांना मोठा दिलासाच मिळणार आहे. यासोबतच मतदार यादीला अंतिम स्वरूप देण्यापूर्वी दुबार मतदारांविरोधात मतदान केंद्रनिहाय कार्यवाही पूर्ण करण्याचेही आदेश निवडणूक आयोगाने दिले आहेत. मतदान केंद्रनिहाय प्रकाशित होणाऱ्या यादीत दुबार नावे स्पष्टपणे चिन्हांकित असावीत असेही निवडणूक आयोगाने म्हटले आहे. ही कार्यवाही करताना वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वत: खातरजमा करून मतदार यादीत सुयोग्य सुधारणा कराव्यात. त्याकरिता बीएलओंनी केलेल्या अहवालावर विसंबून राहू नये अशा सूचनाही आयोगाने केल्या आहेत. राज्य निवडणूक आयोग मतदार याद्या काटेकोर व्हाव्यात यासाठी किती बारकाईने खबरदारी घेत आहे हेच यातून स्पष्ट दिसते. नोंदल्या जाणाऱ्या हरकतींची शक्यतो त्याच दिवशी तपासणी करावी व लगेच अथवा दुसऱ्याच दिवशी त्यांचा निपटारा करावा असेही आयोगाने म्हटले आहे. आयोगाच्या या आदेशातील तपशीलवार सूचना लक्षात घेऊन आता तरी विरोधी पक्षांनी निवडणूक आयोगाविरुद्ध अनाठायी ओरड करणे थांबवले पाहिजे.**

# अलिबागमध्ये शेकापला युतीचे कडवे आव्हान



### खबरबात
प्रकाश सोनवडेकर

अलिबाग हे रायगड जिल्ह्याचे राजधानीचे शहर. पूर्वी अलिबाग नगरपरिषदेवर काँग्रेसचे सत्त असायची. गेली ३२ वर्षे अलिबागवर शेतकरी कामगार पक्षाची सत्ता आहे. रायगड जिल्ह्यात शेकापची सत्ता असलेली एकमेव स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे आलिबाग नगरपरिषद. अलिबाग नगरपरिषद देखील माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्यामुळेच शेकापकडे आहे. यावेळी नगराध्यक्ष पदासाठी शेकापच्या उमेदवार प्रशांत नाईक यांच्या कन्या अक्षया नाईक आणि भाजपच्या उमेदवार माजी नगसेविका तनुजा पेरेकर यांच्यात सरळ लढत आहे. आपली कन्या नगराध्यक्षपदासाठी उभी असल्यामुळे तीला निवडून आणणे हे त्यांच्या साठी आवश्यक आहे. त्यामुळे त्यांची प्रतिष्ठा पणाल लागली आहे. अलिबाग नगरपरिषदेच्या मागील काही निवडणूका प्रशांत नाईक एकहाती जिंकल्या आहेत. अलिबाग नगर परिषदेच्या इतिहासात भाजपा प्रथमच आपल्या कमळ चिन्हावर निवडणूक लढवत आहे. भाजपने पूर्ण ताकद लावली आहे. त्यामुळे भाजप–शिवसेना युतीने शेकापसमोर कडवे आव्हान उभे केले आहे.

अलिबगामध्ये यापूर्वी शेकाप विरूध्द सर्व पक्ष अशी अशी लढत होत होती. यावेळी शेकापने आपला परंपारिक प्रतिस्पर्धी असलेल्या काँग्रेससोबत आघाडी केली आहे. शेकापने काँग्रेसला दोन जागा सोडल्या आहेत. नगराध्यक्षपद आणि आठरा नगरसेवक पदाच्या जागा शेकाप लढवत आहे. अठारपैकी एक जागा शेकापने बिनविरोध जिंकली आहे. प्रभाग क्रमांक २ ब मधून शेकापचे उमेदवार माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक बिनविरोध निवडून आले आहेत. त्यामुळे १९ नगरसेवक पदासाठी निवडणूक होईल. भाजपाने इथे नगराध्यक्ष पदासह तब्बल १६ जागांवर उमेदवार देऊन आघाडीला आव्हान दिले आहे. तर शिवसेना (शिंदे गट) फक्त ४ जागांवर लढणार आहे. नगराध्यक्ष पदासाठी शेकापच्या अक्षया नाईक, महायुतीच्या तनुजा पेरेकर यांच्यात सरळ लढत होणार आहे. १९ नगरसेवक पदासाठी ४१ उमेदवार रिंगणात आहेत. १७ जागांसाठी सरळ तर २ जागांसाठी तिरंगी लढत होणार आहे. १९पैकी १७ ठिकाणी सरळ लढती होतील. प्रभाग क्रमांक ४ मधून २ नगरसेवक निवडून द्यायचे आहेत . या दोन जागांसाठी युती, शेकाप – काँग्रेस, शिवसेना ठाकरे गट आघाडी अशी तिरंगी लढत होईल. प्रभाग क्रमांक सहामध्ये २ पैकी एका ठिकाणी तीरंगी लढत आहे.

अलिबाग नगरपरिषदेचे नगराध्यक्षपद महिलांसाठी राखीव आहे. आरक्षण जाहीर होताच शेकापकडून ॲड. मानसी म्हात्रे यांचे नाव चर्चेत आले. भाजपाकडून वर्षा शेठ यांच्या नावची चर्चा होती. माजी नगरसेविका ॲड. कविता ठाकूर यांनी राष्ट्रवादी काँगेस पक्षाकडे उमेदवारी मागितली होती. परंतु शेकापने माजी नगराध्य प्रशात नाईक यांची कन्या अक्षया नाईक यांची उमदेवारी जाहीर करताच निवडणुकीचे गणित बदलले. वर्षा शेठ यांनी निवडणूक लढवणार नाही असे सांगितले. त्यामुळे भाजपला नगराध्यक्षपदसाठी उमेदवार शोधावा लागला. उमेदवारी अर्ज भरण्यास दोन दिवस शिल्लक असताना शिवसेना ठाकरे गटाच्या माजी नगरसेविका तनुजा पेरेकर यांनी भाजपात प्रवेश केला.त्यांना युतीतर्फे नगराध्यक्षपदाची उमेदवारी देण्यात आली. ॲड. कविता ठाकूर यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज भरला होता. तो त्यांनी मागे घेतला. आता अक्षया नाईक आणि तनुजा पेरेकर यांच्यात नगराध्यक्षपदासाठी सरळ लढत होत आहे.

वास्तविक पहाता अलिबाग म्हणजे प्रशांत नाईक असे समिकरण आहे. प्रशांत नाईक यांच्यामुळे शेकाप ही निवडणूक सहज जिंकले असे वाटत होते. त्यातही युतीला योग्य उमदेवार मिळत नव्हते. उमेदवार शोधण्यात बराच कालावधी गेला. वॉर्डात निवडणूक लढवण्यासाठी देखील उमेदवार शोधावे लागत होते. कदाचीत युती काही जागा लढवेल असे वातावरण होते. त्यामुळे शेकाप ही निवडणूक सहज जिंकले असेच वाटत होते. परंतु उमेदवारी अर्ज भरल्यानंतर मात्र राजकीय वातावरण बदलले. भाजप – शिवसेना युतीने नगराध्यक्षपदासाठी तगडा उमेदवर दिलाच शिवाय सर्व २० नगरसेवक पदांसाठी उमेदवार उभे केले. केवळ उमेदवार उभे कले असेत नाही तर प्रचार देखील योग्य प्रकारे केला जात आहे. त्यामुळे अलिबाग नगरपरिषदेच्याय निवडणूकीत चुरस निर्माण झाली आहे.

आमदार महेंद्र दळवी आणि प्रशांत नाईक हे व्याही आहेत. त्यात प्रशांत नाईक यांची मुलगी नगराध्यक्षपदासाठी उभी राहिल्याने आमदार महेंद्र दळवी अलिबागच्या निवडणुकीत रस दाखवत नाहीत अशी चर्चा होती . परंतु ते युतीच्या उमेदवारांचे अर्ज भरताना हजर होते. त्यांनी आपल्या निवासस्थानी युतीच्या उमेदवारांची आढावा बैठक घेतली. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी या बैठकित उमेदवारांना मार्गर्शन केले. उदय सामंत यांनी सर्वांना युतीच्या उमेदवारांचा प्रचार करण्याचे आवाहन केले. त्यामुळे वातरण निर्मिती झाली.युतीचे सर्व उमेदवार व कार्यकर्ते एकत्र प्रचार करत आहेत. भाजप अलिबागमध्ये प्रथमच कमळ चिन्हावर ही निवडणू लढवत आहे. भाजपचे कमळ चिन्ह असल्यामुळे मतदारांपर्यंत पोहचणे अधिक सोपे बनले आहे. शिस्तबध्द प्रचारमुळे भाजपने या निवडणूकीत रंगत आणली आहे.अलिबागमध्ये शेकापसमोर प्रथमच भाजपाने कडवे आव्हान उभे केले आहे. सुरूवातीला एकतर्फी वाटणारी अलिबाग नगरपरिषदेची निवणूक चुरशीची बनली आहे.

## बदलते तंत्रज्ञान

# टाटा सिएरा मॉडर्न डिझाइनसह लाँच

टाटा मोटर्सने आपली बहुप्रीक्षित एसयूव्ही सिएरा भारतीय बाजारात लॉन्च केली आहे. कारमध्ये ३६० अंश कॅमेरा आणि लेव्हल–२ डव्हान्स्ड ड्रायव्हर असिस्टन्स सिस्टम सारखी सुरक्षा वैशिष्ट्ये देण्यात आली आहेत. नवीन सिएराची प्रारंभिक एक्स–शोरूम किंमत ११.४९ लाख रुपये ठेवण्यात आली आहे. याची बुकिंग १६ डिसेंबरपासून सुरू होईल आणि डिलिव्हरी १५ जानेवारीपासून केली जाईल.



याची स्पर्धा ह्युंदाई क्रेटा, किआ सेल्टोस, स्कोडा कुशाक, फोक्सवॅगन टायगन, मारुती ग्रँड विटारा, होंडा एलिव्हेट आणि एमजी एस्टर यांच्याशी असेल.

एक्सटीरियर: नवीन सिएराच्या ICE व्हर्जनचे डिझाइन थीम सध्याच्या लाइनअपमध्ये समाविष्ट असलेल्या हॅरियर आणि सफारीसारखी ठेवली आहे.याच्या समोरच्या बाजूला कनेक्टेड LED DRLसारखे आधुनिक घटक दिले आहेत. यांच्यामध्ये, कारच्या रुंदीपर्यंत पसरलेली ग्रिल आणि स्टायलिश बंपर दिला आहे. यात हेडलाइट बंपरमध्ये समाकलित केली आहे.


बाजूने SUVसारखा बॉक्सी सिल्हूट पूर्वीसारखाच राहील, ज्यात आयकॉनिक 'अल्पाइन विंडो' डिझाइन मिळेल, नवीन सिएरा ४ दरवाजांची कार असेल. यात फ्लश डोअर हँडल आणि स्टायलिश मल्टी–स्पोक ड्युअल–टोन अलॉय व्हील्स देखील मिळतील.

मागील बाजूसून सिएरा खूप साधी आहे आणि यात कारच्या संपूर्ण रुंदीपर्यंत पसरलेले LED टेल लॅम्प्स दिले आहेत. यात सिल्व्हर स्किड प्लेटसह ग्लॉसी ब्लॅक मागील बंपर दिला आहे जो याला मागून शानदार लुक देतो.

सिएरा कारचे केबिन सध्या टाटाच्या सध्याच्या गाड्यांपेक्षा खूप वेगळे आहे. त्याच्या केबिनमध्ये ट्रिपल स्क्रीन सेटअप देण्यात आला आहे, जो एका पॅनलवर एकत्रित आहे आणि तो डॅशबोर्डच्या पूर्ण रुंदीपर्यंत पसरलेला आहे, जो पहिल्याच नजरेत सर्वांचे लक्ष वेधून घेतो.

त्याच्या डॅशबोर्डवर अनेक ठिकाणी पिवळे हायलाइट्स दिले आहेत, तर एसी व्हेंट्स खूप पातळ आहेत. यात इल्युमिनेटेड लोगो असलेले ४–स्पोक स्टीयरिंग व्हील देण्यात आले आहे. सिएराच्या केबिनमध्ये मागे बेंच सीटसह तीन ॲडजस्टेबल हेडरेस्ट आणि एक सेंटर आर्मरेस्ट आहे.

# सशस्त्र क्रांतिकारक सेनापती बापट



### निमित्त

सेनापती बापट सशस्त्र क्रांतिकारक, तत्त्वचिंतक व लढाऊ समाजसेवक. पूर्ण नाव पांडुरंग महादेव बापट. १९२१ ते १९२४ या कालखंडात पुणे जिल्ह्यातील मुळशी पेट्यात धरणग्रस्त गावांकरिता व शेतकऱ्यांकरिता बापट यांनी सत्याग्रहाचा लढा दिला. त्यामध्ये महाराष्ट्रातील जे शेकडो सत्याग्रही सामील झाले त्यांचे त्यांनी नेतृत्व केले. त्यामुळे 'सेनापती बापट' या शब्दावलीने ते ओळखले जाऊ लागले. सेनापती बापट यांचा आज स्मृतीदिन आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर येथे गरीब कुटुंबात जन्म झाला. आईचे नाव गंगाबाई. माध्यमिक आणि बी.ए. पर्यंतचे उच्च शिक्षण मुख्यत्वे करून पुणे येथे झाले. डेक्कन कॉलेजमध्ये सशस्त्र क्रांतीच्या द्वारे भारत स्वतंत्र करण्याची शपथ तलवारीवर हात ठेवून घेतली. बी.ए. परीक्षेत १९३ साली उत्तीर्ण झाल्यावर मुंबई विद्यापीठाचे शिष्यवृत्ती मिळवून ते इंग्लंडला गेले. एडिंबरो येथे इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये शिक्षण घेत असतानाच क्रांतिकारक विचारांचा प्रचार करीत असल्यामुळे शिष्यवृत्ती बदं होऊन शिक्षण अपुरे राहिले.

श्यामजी कृष्ण वर्मा या क्रांतिकारक नेत्याशी परिचय होऊन त्यांच्या मदतीने पॅरिस येथे राहून तेथील रशियन क्रांतिकारकांकडून प्रचंड स्फोटक बाँबची तंत्रविद्या हस्तगत केली. त्या तंत्रविद्येची पुस्तिका भारतात व बंगालमधील क्रांतिकारक गटांपर्यंत पोहोचविली. क्रांतिकारकांच्या कटाच्या एका खटल्यात माफीच्या साक्षीदाराने बापटांचे नाव उघडकीस आणल्यामुळे बापट हे चार वर्षे अज्ञातवासात राहिले. नंतर १९२१पर्यंत स्वत:च्या जन्मगावी शिक्षक म्हणून राहिले आणि समाजसेवेचे व्रत घेतले. पहाटे उठल्याबरोबर गावचे रस्ते झाडणे व शौचकूप साफ करणे हे व्रत त्यांनी जन्मभर स्वीकारले. १९२१ ते १९२४ या कालखंडात पुणे जिल्ह्यातील मुळशी पेटा येथील धरणग्रस्त शेतकऱ्यांना जमीन मिळविण्याकरिता सत्याग्रहाचे आंदोलन चालविले. या आंदोलनात कारागृहवासाची तीनदा शिक्षा त्यांना झाली. शेवटची सात वर्षे सक्तमजुरीची होती. राजकीय स्वातंत्र्याच्या आंदोलनामध्ये भाग घेत असताना राजद्रोहात्मक भाषणे केल्याबद्दल अनेकदा अनेक वर्षे सक्तमजुरीची शिक्षा झाली.

संस्थांनी प्रजांच्या हक्कांकरिता चालू असलेल्या आंदोलनात भाग घेऊन संस्थानाच्या प्रवेशबंद्या त्यांनी मोडल्या; त्याबद्दल कारागृहवासही सोसला. स्वातंत्र्योत्तरकाळातही भाववाढ विरोधी आंदोलन, गोवामुक्ती आंदोलन, संयुक्त महाराष्ट्र आंदोलन इ. आंदोलनांमध्ये त्यांनी पुढाकार घेतला. आंदोलन करीत असताना कारागृहात आंदोलनाला पूरक अशा तऱ्हेचे साहित्य लिहिले व ते प्रकाशित केले.

त्यांनी अपुरे राहिलेले छोटेसे आत्मचरित्र लिहिले आहे. बरेचसे लेखन मराठीत व थोडे इंग्रजीत व संस्कृतमध्ये केले; लेखनाला पद्याकार दिला. क्रांतिवादी राजकारणाचे समर्थन करणारे, भगवतगीतेच्या तत्त्वज्ञानावर आधारलेले, राष्ट्रमुक्ती व अन्याय प्रतिकार या दोन मुद्यांना अनुसरून युक्तिवाद केलेले हे साहित्य आहे. चैतन्यगाथा हे पुस्तक वाचले म्हणजे त्यांचे मूलभूत विचार लक्षात येतात.

(साभार : विकासपीडिया)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# खूप तहान असल्यास होऊ शकतो हा आजार

शरीर निरोगी ठेवायचे असेत तर दररोज पुरेसे पाणी पिण्याचा सल्ला दिला जातो. पाण्यामुळेच शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतात, ज्यामुळे मनुष्य अनेक आजारांपासून दूर राहू शकतो. पाणी पिल्यानंतरच अन्न पचण्यासही मदत होते. याशिवाय वजन कमी करण्यासाठी पाणी देखील उपयुक्त ठरू शकते. परंतु तुम्हाला माहिती आहे का, जास्त तहान लागणे देखील आरोग्यासाठी हानिकारक ठरु शकते.



जर तुम्हाला ही वारंवार तहान लागत असेल तर ही बातमी तुमच्यासाठी महत्त्वाची आहे. तुम्हाला जर जास्त तहान लागत असेल तर काळजी घेणे आवश्यक आहे. कारण हे कोणत्यातरी आजारांचे लक्षणं देखील असू शकते.

**मधुमेह :** वारंवार तहान लागत असेल तर मग रक्तातील साखर वाढल्याचे हे लक्षण असू शकते. शरीरातील साखरेचे प्रमाण वाढले की, आपले शरीर लघवीद्वारे ती काढून टाकण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे शरीरात पाण्याची कमतरता भासते आणि जास्त तहान लागते.

**अशक्तपणा :** शरीरात हिमोग्लोबिनच्या कमतरतेमुळे ॲनिमिया होतो. ही समस्या महिलांमध्ये जास्त दिसते. हे अनेक कारणांमुळे होऊ शकते, जसे की खराब आहार किंवा जास्त रक्तस्त्राव. या स्थितीत तुम्हाला जास्त तहानही लागते. यामध्ये चक्कर येणे, थकवा येणे, घाम येणे आणि इतर लक्षणे देखील असू शकतात.

**वारंवार तोंड कोरडे पडणे :** तोंड कोरडे पडल्याने तहान लागण्याची समस्या निर्माण होते. अति धुम्रपान, जास्त प्रमाणात औषधे घेणे इत्यादींमुळे देखील ही समस्या उद्भवते ज्यामुळे तोंड कोरडे पडण्याची समस्या वारंवार उद्भवते, ज्यामुळे तुम्हाला जास्त तहान लागते. तोंड कोरडे पडत असल्यास दुर्गंधी, चव बदलणे, हिरड्या जळणे आणि अन्न चघळण्यास त्रास होऊ शकतो.

**वारंवार लघवी होणे :** गर्भधारणेमुळेदेखील तहान लागण्याची समस्या उद्भवते. पहिल्या तीन महिन्यात रक्ताचे प्रमाण वाढते ज्यामुळे मूत्रपिंडात जास्त द्रव तयार होतो, ज्यामुळे वारंवार लघवी होते. याशिवाय शरीरात पाण्याच्या कमतरतेमुळे जास्त तहान लागते.

अशी लक्षणे दिसल्यास दररोज हायड्रेशन दिनचर्या तयार करा. द्रवपदार्थाचे सेवन आणि लघवीचे प्रमाण मोजा.मीठ आणि साखरेचे प्रमाण कमी करण्यासाठी आहार समायोजित करा.

# रोह्यातील चोरीप्रकरणी आरोपी अटकेत; स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेची कारवाई

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा पोलीस ठाण्यातील गु.र.नं. २९८/२०२५, बी.एन.एस. कलम ३३१(३), ३३१(४), ३०५अ अंतर्गत दाखल चोरी प्रकरणात स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने महत्वपूर्ण धागेदोरे मिळवत मोठे जाळे उघडकीस आणले आहे.

पोलीस अधीक्षक यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक अविनाश पाटील व त्यांच्या पथकाने समांतर तपासादरम्यान सिद्ध झालेले पुरावे तपासता संशयित इसम राज रविंद्र रटाटे (वय २६, रा. धाटाव) यास ताब्यात घेऊन सखोल चौकशी केली. चौकशीदरम्यान त्याने चोरीत सहभागी असलेल्या एकूण नऊ साथीदारांची नावे उघड केली आहेत.

आरोपींची नावे पुढीलप्रमाणे : अक्षय रटाटे , भरत चंद्रकांत मालुसरे, शुभम नथुराम मोरे, ऋतिक ज्ञानदेव खाटे, दिनेश शांताराम भोगटे , नितेश भोगटे, गणेश रविंद्र मालुसरे, किरण किशोर भगत – सर्व रा. धाटाव, ता. रोहा अनिकेत जाधव – रा. महाड हे आरोपी तपासात उघड झाले आहे की ऋतिक रटाटे व अक्षय रटाटे हे साधना कंपनीत काम करत असून चोरीस गेलेल्या मालाचे सॅम्पल मिळवून ते आरोपी राज रटाटे व त्याच्या साथीदारांच्या ताब्यात देत असत. त्यानंतर हा सर्व चोरीचा माल महाड येथील अनिकेत जाधव याच्याकडे दिला जाई आणि तो पुढे त्याची विल्हेवाट लावत असल्याची कबुली राज रटाटेने दिली आहे.

संशयित राज रटाटेची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून त्यास पुढील कायदेशीर कारवाईसाठी ताब्यात घेण्यात आले आहे. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या या कारवाईमुळे रोहा–महाड परिसरातील या मोठ्या चोरी प्रकरणाचे जाळे उघड झाले असून आणखी काही महत्वाची माहिती समोर येण्याची शक्यता तपास पथकाने व्यक्त केली आहे.

---

# उप विभागीय अधिकारी, पनवेल यांचे कार्यालय

**भुमिसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ अंतर्गत**

**कलम १९ ची अधिसुचना**

याअर्थी, समुचित शासन असलेल्या रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश ''उक्त अधिनियम '' असा केला आहे) यांच्या कलम १३ च्या पोट कलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना दिनांक २६/१२/२०२४ अन्वये कलम ११ ची अधिसुचना प्रसिध्द केली आहे. आणि त्याव्दारे असे अधिसुचित केले आहे की, यासोबत जोडलेली अधिसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिन संपादीत करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुर्दीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (ग) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उप विभागीय अधिकारी, पनवेल यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची–एक**

**जमिनीचे वर्णन**

**गाव :– पनवेल, तालुका–पनवेल, जिल्हा रायगड**

| अनुक्रमांक | न.भू.क्रं. | संपादीत क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|
| १ | ४५९/१ | ३७.७० |
| २ | ४५९/२ | |
| ३ | ४५९/३ | |
| ४ | ४५९/४ | |
| ५ | ५००/१ | ५३.५० |
| ६ | ५००/२ | २२.५९ |
| ७ | ५००/३ | ७.१७ |
| ८ | ५०२/० | १८७.३० |
| ९ | ५८८ | १३.३६ |
| १० | ५९३/अ | ३३.५६ |
| ११ | ५९३/ब | |
| १२ | ६१९/० | २३.८१ |
| १३ | ६१९/१ | ११.५४ |
| १४ | ६१९/३ | २१.५५ |
| १५ | ६२०/० | १.०० |
| १६ | ६२४ | १.५० |
| १७ | ६२५/० | ८.२२ |
| १८ | ६२७ | ९९.०७ |
| **एकुण** | | **५२१.८७** |

**अनुसूची–दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

**अधिसूचना :– प्रकल्पाचे नाव** :– मौजे–पनवेल, ता. पनवेल येथील लोकमान्य बाळगंगाधर टिळकमार्ग (जय भारत नाका–अन्नपुर्णा ते स्वातंत्र्यवीर सावरकर चौक) ५२१.८७ चौ.मी. रस्ता रुंदीकरण प्रयोजनासाठी.

**निर्गमित :– प्रकल्प कार्याचे वर्णन** :– मौजे पनवेल, ता. पनवेल येथील लोकमान्य बाळगंगाधर टिळकमार्ग (जय भारत नाका–अन्नपुर्णा ते स्वातंत्र्यवीर सावरकर नमूद चौक) न.भू.क्रं. ४५९/१ ते अ.भू.क्र.६२७ संयुक्त विवरणपत्रात नमूद केलेल्या मिळकतीप्रमाणे एकूण क्षेत्र ५२१.८७ चौ.मी. रस्ता रुंदीकरण बांधकाम जलद गतीने करणेसाठी आवश्यक आहे.

**करण्यापूर्वी :– समाजाला मिळणारे लाभ** : पनवेल शहराचे औद्योगिक महत्व व नागरीकरण तसेच विकास आणि विस्तार वेगाने होत असल्याने प्रस्तावित करण्यांत आलेले क्षेत्र संपादन केलेखेरीज समाजाची उन्नती होऊ शकणार नाही. त्यामुळे सार्वजनिक रहदारीसाठी रस्ता रुंदीकरण करणे आवश्यक आहे.

**अनुसूची–तीन**

**बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :–** निरंक

**अनुसूची–चार**

**सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश :** मौजे पनवेल, ता. पनवेल लोकमान्य बाळगंगाधर टिळकमार्ग (जय भारत नाका–अन्नपुर्णा ते स्वातंत्र्यवीर सावरकर नमूद चौक) ५२१.८७ चौ.मी. रस्ता रुंदीकरण करणे आवश्यक आहे. भूसपादन कायदा २०१३ च्या तरतूदीस अधीन राहून जमिनी संपादन करणे प्रस्तावित करण्यांत आले आहे. या जमिनी संपादन केल्यामुळे केवळ १८ खातेदार बाधीत होत आहेत व खातेदार विस्थापित होत नाहीत. संपादीत करावयाच्या जमिनी पिकाखाली नाहीत. पनवेल शहराचे औद्योगिक महत्व व नागरीकरण तसेच विकास आणि विस्तार वेगाने होत असल्याने सार्वजनिक हितासाठी भूसंपादन अधिनियम २०१३ कलम ९ व ४० मधील तरतुदीनुसार सामाजिक परिणाम निर्धारणाच्या अभ्यासाची आवश्यकता नाही.

सदर भूसंपादन प्रक्रिया लवकरात लवकर सुरु करावी.

**सही/–**
**(पवन चांडक)**
**उप विभागीय अधिकारी पनवेल**
**उप विभाग पनवेल**

**ठिकाण :– पनवेल**
**दिनांक :– २५/११/२०२५**

# BY THE SUB DIVISIONAL OFFICER PANVEL, SUB DIVISION PANVEL

**NOTIFICATION OF SECTION 19 UNDER RIGHT TO GET APPROPRIATE COMPENSATION AND TRANSPARENCY IN LAND ACQUISITION, REHABILITATION, RESETTLEMENT ACT 2013**

Whereas, the District Collector of Raigad District, with proper governance, is entitled to appropriate compensation for land acquisition, rehabilitation and resettlement, and by sub-section (1) of section 11 of the Right to Transparency Act, 2013 (30 of 2013) (hereinafter referred to as the Act) by using the powers, the notification, dated 26/12/2024, has been drawn in the initial notification and by that notification is made, along with a detailed description of the land done more in the attached Schedule A, Schedule two requires or is likely to require a more detailed specific public purpose.

And, after considering the report given by sub-section (2) of section 15, if any, by the Collector of Raigad District, it is convinced that the said land needs to be acquired for the said public purpose. Therefore, under the provisions of sub-section (1) of section 19 of the said Act, it is hereby declared that the said land is required for the public purpose.

And whereby the areas described in more detail in Schedule III are designated as Rehabilitation Areas for the purpose of rehabilitation and rehabilitation of the affected families, the summary of the Rehabilitation and Resettlement Scheme is specified in Schedule Four

AND WHEREAS, the District Collector under Clause (c) of Section 3 of the said Act is deputing the Suh Divisional Officer Panvel, Sub Division Panvel, (Old Thana Naka) to perform the functions of the Collector under the said Act;

**Schedule-1**

**Description of the Land**

**Village :- Panvel, Tal.:- Panvel, District :- Raigad**

| Sr.No. | C.T.S.No. | Area in Sq.Mt. |
|---|---|---|
| 3 | 459/1 | 37.70 |
| 4 | 459/2 | |
| 5 | 459/3 | |
| 6 | 459/4 | |
| 8 | 500/1 | 53.50 |
| 9 | 500/2 | 22.59 |
| 10 | 500/3 | 7.17 |
| 11 | 502/0 | 187.30 |
| 16 | 588 | 13.36 |
| 20 | 593/A | 33.56 |
| 21 | 593/B | |
| 56 | 619/0 | 23.81 |
| 57 | 619/1 | 11.54 |
| 59 | 619/3 | 21.55 |
| 60 | 620/0 | 1.00 |
| 69 | 624 | 1.50 |
| 70 | 625/0 | 8.22 |
| 71 | 627 | 99.07 |
| TOTAL | | **521.87** |

**Schedule-11**

Notification: Name of the project : Lokmanya Balgangadhar Tilak Marg (Jai Bharat Naka-Annapurna to Swatantryaveer) in Panvel, Panvel District Savarkar Chowk) 521.87 sq.m. For road widening purpose

Summary of Social Impact Assessment: : Lokmanya Balgangadhar at Mauje-Panvel, Tal. Panvel Tilak Marg (Jai Bharat Naka-Annapurna to Swatantryaveer Savarkar) Chowk) No. Land No. 459/1 to Land No. 627 Total area as per the property mentioned in the joint return 521.87 sq.m. Road Widening is necessary for speedy construction.

**Schedule-III**

Compelling the displacement of the affected person: Nil

**Schedule-IV**

Summary of Social Impact Assessment: Mauje-Panvel, Taluka-Panvel, Lokmanya Balgangadhar Tilak Marg (Jai Bharat Naka-Annapurna to Swatantryaveer Savarkar Chowk) 521.87 sq.m. in Panvel, Taluka Panvel, subject to the provisions of the Land Acquisition Act 2013. The acquisition of these lands Only 18 account holders are being affected and the account holders are not being displaced. The lands to be modified are not under crop. The industrial importance and urbanization of Panvel city as well as Since the development and expansion is happening at a rapid pace, there is no need for a Social Impact Assessment Study as per the provisions of Sections 9 and 40 of the Land Acquisition Act, 2013 in the public interest. This land acquisition process should begin as soon as possible. The amendment to chapter III under Close 10 A of the LAAR (Maharashtra & Annendment) Act 2018.

**Place: Panvel**
**Date: 25/11/2025**

**sd/-**
**(Pavan Chandak)**
**Sub Divisional Officer Panvel**

क्र. जिमाका/ रायगड/जाहिरात/२९६/१६४४/२०२५

# फ्लेमिंगो सिटीतील पाणथळ जागा ओस

## हवामान बदलाचा परिणाम; पक्षीप्रेमींना गुलाबी पाहुण्यांची आस

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

दरवर्षी हिवाळ्याच्या सुरुवातीला गुलाबी थव्यांनी नवी मुंबईच्या खाडीकिनाऱ्याला नवा रंग देणारे फ्लेमिंगो पक्षी यंदा मात्र अद्यापही शहरात आलेले नाहीत. लांबलेल्या पावसामुळे पाणथळ जागांचा नैसर्गिक ताळमेळ बिघडल्याने आणि आहाराची कमतरता निर्माण झाल्याने त्यांच्या स्थलांतराला विलंब होत असल्याचे पर्यावरणतज्ज्ञ सांगत आहेत.



फ्लेमिंगोंचे मूळ वास्तव्य आफ्रिका, युरोप आणि दक्षिण अमेरिकेतील खारफुटी प्रदेशात आढळते. भारतात मात्र या पक्ष्यांच्या दोन प्रमुख प्रजाती म्हणजेच ग्रेटर फ्लेमिंगो आणि लेसर फ्लेमिंगो या मोठ्या प्रमाणावर आढळतात. नवी मुंबईत दरवर्षी येणारे हे पक्षी मुख्यत्वे गुजरातमधील कच्छ आणि राजस्थानातील मिठागर प्रदेशातून स्थलांतर करून खाडी परिसरातील पाणथळ जागांकडे वळत असतात. नोव्हेंबर ते मे हा त्यांचा नवी मुंबईतील नियमित वावराचा काळ मानला जातो. जानेवारी ते मार्चदरम्यान त्यांची शहरातील पाणथळ भागातील उपस्थिती शिगेला पोहोचते. नेरुळ-सीवुड्स परिसरातील टीएस चाणक्य येथील पाणथळ जागा, डीपीएस तलाव, ज्वेल ऑफ नवी मुंबई तसेच खाडीजवळील खारफुटी पट्टा ही त्यांची प्रमुख ठिकाणे मानली जातात. या अधिवासांत सूक्ष्म शैवाल आणि खाऱ्या पाण्यातील लहान जीवसृष्टी मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याने फ्लेमिंगोंना हा परिसर नैसर्गिकरीत्या अनुकूल वाटतो.

यंदा लांबलेल्या पावसामुळे शहरातील अनेक पाणथळ जागा अद्याप स्थिर झालेल्या नाहीत. पाण्याची पातळी जास्त असून, काही ठिकाणचे जलप्रवाह अडथळ्यांमुळे असंतुलित आहेत. त्यामुळे सूक्ष्म शैवालांची वाढ कमी झाल्याने फ्लेमिंगोंच्या आहारात घट निर्माण झाली आहे. फ्लेमिंगो हे अतिशय संवेदनशील पक्षी आहेत. पाणथळ पट्ट्यांचा दर्जा आणि आहारातील छोटा बदलही त्यांच्या स्थलांतरावर थेट परिणाम करतो, असे स्थानिक पर्यावरण अभ्यासकांनी म्हटले आहे. तज्ज्ञांच्या मते, ही केवळ पक्ष्यांच्या उशिरा आगमनाची बाब नाही; तर नवी मुंबईतील पाणथळ परिसंस्थेला गंभीर धोक्याचा इशारा आहे.

शहराची 'फ्लेमिंगो सिटी' ही ओळख टिकवायची असेल, तर पाणथळ जागांचे संरक्षण, जलप्रवाहाचा ताळमेळ आणि खाडी परिसरातील परिसंस्थेचे आरोग्य तातडीने मजबूत करण्याची आवश्यकता असल्याचे मत पर्यावरणतज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

### २०१७च्या पुनरावृत्तीची भीती

लांबलेला पावसाळा आणि गायब झालेल्या थंडीमुळे फ्लेमिंगो अद्याप गुजरातच्या कच्छ भागात असल्याचा अंदाज आहे. बदलत्या पर्यावरणाचा परिणाम म्हणून २०१७ साली केवळ एकच महिना फ्लेमिंगो नवी मुंबईत पाहायला मिळाले होते. तशीच काहीशी परिस्थिती सध्या दिसत आहे. तरी यावर्षीच्या अखेरील फ्लेमिंगो नवी मुंबईत येण्याची शक्यता आहे, असे 'सेव्ह नवी मुंबई एन्व्हायरमेंट' संस्थेचे अध्यक्ष सुनील अग्रवाल यांनी सांगितले.

# खोपोलीत महायुतीची प्रचारफेरी

## पनवेल भाजप पदाधिकाऱ्यांचा सहभाग

**पनवेल, खोपोली : रामप्रहर वृत्त**

खोपोली नगर परिषद निवडणुकीत विजय मिळवण्यासाठी भाजप महायुतीतर्फे भव्य प्रचार फेरी काढण्यात आली. प्रचंड उत्साहात पार पडलेल्या या प्रचारफेरीत कार्यकर्त्यांनी विजयी घोषणांनी आसमंत दुमदुमून संपूर्ण शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण केले. या जोशपूर्ण वातावरणाला नागरिकांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला.



या प्रचारफेरीत भाजपचे खोपोली निवडणूक निरीक्षक पनवेलचे माजी नगरसेवक तसेच भाजपा उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, निरीक्षक भाजप उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष सुनील घरत, अजय इंगुळकर, नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, किशोर चौतमोल, संजय म्हात्रे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित कार्यकर्त्यांसह सहभागी झाले होते. भाजपा महायुतीचे उमेदवार इंदरमल खंडेलवाल, संजय तन्ना, मयुरी शेलार आणि सोनिया रुपवते यांनी नागरिकांशी संवाद साधत पक्षाची विकासनिष्ठ भूमिका पटवून दिली.


या उमेदवारांच्या उत्साही सहभागामुळे आणि प्रभावी जनसंपर्कामुळे जनतेची मने जिंकण्यात महायुतीला मोठ्या प्रमाणात यश मिळाल्याचे चित्र दिसून आले.



# वकील संघटनेच्या अध्यक्षपदावर ॲड. भुजबळ चौथ्यांदा बाजी मारणार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल वकील संघटना म्हणजेच पनवेल बार असोसिएशनच्या व्यवस्थापन समितीच्या जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२८'' या कालावधीसाठी शनिवारी २९ नोव्हेंबर २०२५ रोजी होणाऱ्या त्रैवार्षिक निवडणूकिच्या प्रचारात वकिली व्यवसायाबरोबरच राजकीय, सामाजिक क्षेत्राचा दांडगा अनुभव असणारे जेष्ठ सहकारी ॲड. मनोज भुजबळ यांच्या पॅनलने आघाडी घेतली असून या पॅनलचाच विजय होणार आणि ॲड. भुजबळ हे वकील संघटनेच्या अध्यक्षपदावर चौथ्यांदा बाजी मारणार असा विश्वास पनवेलच्या वकीलांमधून व्यक्त करण्यात येत आहे.



मागील कालावधीत ॲड. मनोज भुजबळ यांनी आणि त्यांच्या सक्षम सहकाऱ्यांनी न्यायालयीन कामकाजात वकील, अशील, कर्मचारी आणि न्यायालयात उद्भवणारे प्रश्न तसेच समस्या सोडवण्यासाठी विशेष काम केले आहे. यात प्रामुख्याने नवीन इमारतीसाठी पाठपुरावा, नवोदित वकिलांसाठी मार्गदर्शक व्याख्यानमाला, न्यायालयात विविध सुविधा पुरवण्या संदर्भात पाठपुरावा केला असून गरजवंत नवोदित वकिलांना विशेष सहकार्य केले आहे. तरुण वकिलांना केवळ अध्यक्ष नको, तर मार्गदर्शक, संरक्षक आणि खऱ्या अर्थाने विचारवंत याची गरज आहे. ॲड. मनोज भुजबळ यांनी तरुण वकिलांना मजबूत उभं राहण्यासाठी आधार दिला, दिशादर्शन आणि न्याय्य मंच दिला आहे. त्यांचा पॅनल हा स्वार्थासाठी नाही, तर बारच्या एकात्मतेसाठी आणि तरुणांच्या उज्वल भविष्यासाठी उभा आहे. म्हणूनच पुन्हा एकदा पनवेल बारमध्ये सकारात्मक बदल, सुरक्षित व्यावसायिक वातावरण आणि तरुणांना खऱ्या अर्थाने बळ देणारे नेतृत्व हवं असेल, तर ॲड. मनोज भुजबळ आणि त्यांच्या सक्षम पॅनलला दिलेला सभासद वकिलांचे एक मत पनवेल बारच्या भविष्यातील सर्वात मजबूत गुंतवणूक ठरेल. अशी ग्वाही पॅनलच्या वतीने देण्यात आली.

वकिलांसाठी डिजिटल लायब्ररी सुरू करणे, कर्मचारी संख्या वाढवण्यासाठी पाठपुरावा करणे, नवीन इमारतीचे मजले वाढवणे, जुन्या इमारतीचे बांधकाम सुरुं करणे, इतर न्यायिक प्राधिकरण पनवेलला आणणे, भ्रष्टाचाराला आला घालणे, डिजिटल कामकाज सुरु करणे, वाकीलासाठी ग्रुप इंशोरंस योजना लागू करणे, वैध्याकीय सोयीसुविधा उपलब्ध करून देणे, सुनावान्यांच्या दिवसात सुसूत्रता आणणे या महत्वाच्या प्रश्नांसोबाटचा यांसारखी ईतर कामे मार्गी लावण्यासाठी पाठपुरवा करणार असल्याचे पॅनलच्या जाहीरनाम्यात आश्वासन देण्यात आले आहे.

पनवेल मधील वकिलांच्या सक्षम नेतृत्वासाठी पॅनलमधील अध्यक्ष पदाचे उमेदवार ॲड. मनोज कृष्णाजी भुजबळ यांच्यासह उपाध्यक्ष पदासाठी ॲड. संतोष जोमा म्हात्रे, सचिव पदासाठी ॲड. प्रल्हाद घनश्याम खोपकर, सहसचिव (महिला राखीव) पदासाठी ॲड. हेमा सिताराम भगत, खजिनदार पदासाठी ॲड. धनराज कान्हा तोकडे, सहखजिनदार पदासाठी ॲड. विशाल लक्ष्मण डोंगरे, ऑडिटर पदासाठी ॲड. भूषण मोरेश्वर म्हात्रे, कार्यकारिणी सदस्य पदासाठी ॲड. विजयेंद्र नारायण मुंढे, ॲड. इर्शाद रमझान शेख तथा कार्यकारिणी सदस्य (महिला राखीव) पदासाठी ॲड. ज्योती पी. राऊत - उरणकर, ॲड. छाया रामदास म्हात्रे या सहकाऱ्यांना मतदान करून ॲड. मनोज भुजबळ यांच्याच पॅनलला विजयी करा, असे आवाहन पॅनलच्या वतीने सर्व पनवेलच्या वकीलांप्रती करण्यात आले आहे.

# सीकेटी विद्यालयात मेकरथॉन स्पर्धा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक (सीकेटी) विद्यालयात संस्थेचे कार्याध्यक्ष, लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या अमृतमहोत्सवानिमित्त २५ नोव्हें रोजी विज्ञान समितीतर्फे मेकरथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या नाविन्यपूर्ण स्पर्धेसाठी ११ वी व १२ कॉमर्स आणि सायन्स शाखेतून ३५ गटातील १३२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. इंग्रजी माध्यमिक विभागातील सहशिक्षिका स्मिता भालेराव (एमएससी बीएड) तसेच सहशिक्षिका केशरी भोईर (बीएससी बीएड. डीएसएम) या परीक्षकांनी संपूर्ण स्पर्धेचे परीक्षण केले. मेकरथॉन स्पर्धेतील चॅलेंजमध्ये केवळ आइस्क्रीमच्या काड्या आणि मर्यादित साहित्य वापरून कार्यक्षम पूल तयार करण्याची स्पर्धा होती यामध्ये विद्यार्थ्यांच्या स्थिर रचना तयार करण्याची क्षमता, भार वाटपाच्या समजूतीची आणि मर्यादित साधनसामग्रीत समस्या सोडवण्याच्या कौशल्याची चाचणी घेण्यात आली. या स्पर्धेत सर्व विद्यार्थ्यांचे प्रयत्न उल्लेखनीय होते.

या स्पर्धेत १२वी सायन्स ८ (गट क्रमांक ३५) या गटाने प्रथम क्रमांक तर ११ वी सायन्स १ ( गट क्रमांक १) या गटाने द्वितीय क्रमांक तर ११ वी सायन्स १० ( गट क्रमांक ७) या गटाने तृतीय क्रमांक पटकावला. स्पर्धेतील विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी व सर्टिफिकेट देऊन गौरव करण्यात आला. या स्पर्धेसाठी संकुलातील मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, ,इंग्रजी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पर्यवेक्षक कैलास म्हात्रे, अजित सोनवणे, पर्यवेक्षिका वैशाली पारधी, स्वाती पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

मेकरथॉन आईस्क्रीम स्टिक ब्रिज बिल्डिंग या शैक्षणिक व सर्जनशील अशा उपक्रमाचे यशस्वीपणे आयोजन विज्ञान विभागातर्फे करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना संरचनात्मक अभियांत्रिकीचे प्रत्यक्ष अनुभव मिळाले टीमवर्कची जाणीव झाली आणि नियोजन व साहित्याच्या कार्यक्षमतेचे महत्त्व कळले .विज्ञान विभागाच्या सहशिक्षिका स्मिता नाईक यांनी कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन केले.

# विजयश्री पाटील यांना पुरस्कार

**पनवेल :** साने गुरुजी संस्कार साधना पुणे या संस्थेने विजयश्री राजेंद्र पाटील यांना २३ नोव्हेंबर रोजी आदर्श शिक्षिका पुरस्कार देऊन गौरवले.



पनवेल तालुक्यातील शांतीवन येथील अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे अनुदानित माध्यमिक आश्रम शाळेत विजयश्री पाटील या शिक्षिका आहेत. २००० पासून त्या सेवेत रुजू होऊन २५ वर्षे आदिवासी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास साधण्यासाठी त्या कटिबद्ध आहेत. तालुक्यातील आदिवासी समाजातील ठाकूर जमातीच्या स्त्रियांचे जीवन, आदिवासी भागातील पाणीटंचाई, आदिवासी स्त्रियांमध्ये सिकलसेल एक गंभीर समस्या या विषयावर अभ्यासपूर्ण शोध निबंध त्यांनी लिहीले आहेत. तसेच जिल्ह्यातील आदिवासी समाजातील स्त्रियांच्या जीवनमानावर शिक्षणाचा झालेला परिणाम या विषयावर संशोधन कार्य सुरू आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून त्यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

# कोपर शाळेत संविधान दिन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येशील रायगड जिल्हा परिषदेच्या कोपर (गव्हाण) येथील प्राथमिक शाळेत भारतीय संविधान दिन अतिशय उत्साहात् व आनंदी वातावरणात झाला.

या वेळी शाळेचे चेअरमन अनंतशेठ ठाकूर, बि.टी. कांबळे, ग्रामस्थ मंडल कोपरचे अध्यक्ष वैभव घरत, उद्योजक रमेश ठाकूर, काशिनाथ पाटील, सुदर्शन घरत आदी उपस्थित होते. या वेळी मान्यवरांच्या हस्ते संविधानाच्या पालखीचे पूजन करण्यात झाले. यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी लेझीम पथकासह संविधान रॅली काढली.

विद्यार्थ्यांनी सुंदर वेशभूषा केली होती. कार्यक्रमात शाळेच्या मुख्याध्यापिका सुप्रिया पेणकर यांनी मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षकांनी अथक प्रयत्न केले.



# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये संविधान दिवस

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संविधान दिनाचे औचित्य साधून रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील सौ. रामशेठ ठाकूर स्कूल सीबीएससी उलवे येथे दोन दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये २५ नोव्हेंबर २०२५ रोजी स्कूलमध्ये संविधान महोत्सव समिती उलवे यांच्यामार्फत संविधान अवेअरनेस ड्रामा सादर करण्यात आला ज्यामध्ये संविधानाबाबत जन जागृती निर्माण करण्यात आली.



बुधवारी सामुदायिक संविधान वाचन घेऊन उलवे परिसरात रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी स्कूलमध्ये तयार केलेल्या संविधान घोषवाक्य घेऊन रॅलीमध्ये सहभागी झाली होती. स्कूलमधील सर्व शिक्षक विद्यार्थी यांनी या कार्यक्रमांमध्ये सहभाग नोंदविला.

# पनवेल पंचायत समिती कार्यालयात संविधान दिवस साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंचायत समिती पनवेल कार्यालयात संविधान दिवस साजरा करण्यात आला. गट विकास अधिकारी समीर वाठारकर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन केले. या प्रसंगी सहाय्यक गट विकास अधिकारी राजेंद्र कोलटक्के, पशुधन विकास अधिकारी आनंद मारकवर, गट शिक्षण अधिकारी शाहू सतपाल तसेच गुलाब बहिरम सहाय्यक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती पूर्ण स्टाफ उपस्थित होता.




या वेळी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन केले. या ठिकाणी संविधान फोटो फ्रेम ठेवण्यात आली होती. गट विकास अधिकारी यांनी संविधान बाबत आपले विचार व्यक्त केले. चेतन गायकवाड यांनी संविधान शपथ वाचन केले व त्यांच्या मागून सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी संविधान शपथ घेतली. तसेच २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबई वर जो दहशत वादी हल्ला झाला आणि त्यामध्ये शहीद झालेल्या शहीद लोकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# एमएनएम विद्यालयात एम पॉवरतर्फे कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालयात आदित्य बिर्ला समूहा पुरस्कृत एम पॉवर संस्थेतर्फे विद्यार्थी मानसिक आरोग्य व ताणतणाव व्यवस्थापन या विषयक कार्यशाळेचे आयोजन इयत्ता नववी तसेच अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी करण्यात आले. आले.



शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी एम पावरच्या प्रमुख वक्त्या तृषल वडवलकर यांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांना संबोधित करताना विद्यार्थ्यांनी अभ्यासादरम्यान ताण-तणाव, अतिविचार, नकारात्मक विचारसरणी यांना दूर ठेवत सकारात्मक विचारांचा अवलंब, वेळेचे नियोजन करत अपेक्षित यश संपादन करू शकतात असे नमूद केले. आजच्या गतिशील, स्पर्धेच्या युगामध्ये विद्यार्थी देखील प्रचंड ताणतणावाला सामोरे जात असून, विद्यार्थ्यांनी आपल्या समस्या विश्वासार्ह व्यक्ती म्हणजेच आई वडील, शिक्षक, यांच्याशी चर्चा करून सोडवाव्यात, अतिरिक्त ताण घेऊ नये जेणेकरून मानसिक आरोग्याला धोका पोहचेल असेदेखील नमूद केले.

शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी विद्यार्थ्यांना तणावमुक्त वातावरणात सकारात्मक दृष्टिकोन ठेवून परीक्षेला सामोरे जाऊन यश संपादित करा, असे सांगितले. विद्यार्थी विद्यार्थिनींनी विचारलेल्या विविध प्रश्नांचे निरसन एम पावर संस्थेच्या समन्वयिका तृषल वडवलकर यांनी केले. या कार्यशाळेमध्ये इयत्ता नववी व अकरावी वर्गशिक्षक व विषय शिक्षक यांनी आपला सहभाग नोंदवला.

# उरण कामठा येथे निवडणूक बूथचे उद्घाटन

**उरण : वार्ताहर**

उरण नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ असल्याने उरण नगर परिषद हद्दीतील कामठा येथील प्रभाग क्रमांक १० चे भाजप महायुतीच्या नगराध्यक्ष पदाचे उमेदवार शोभा कोळी-शाह व प्रभाग क्रमांक १० चे (अ) चे नगरसेवक उमेदवार राजेश मधुकर ठाकूर, प्रभाग क्रमांक १० चे (ब) चे उमेदवार सायली सविन म्हात्रे व प्रभाग क्रमांक १० चे (क) चे उमेदवार दमयंती वैभव म्हात्रे यांच्या निवडणूक बूथचे उद्घाटन आमदार महेश बालदी यांच्या हस्ते झाले.



या वेळी भाजप उरण शहर अध्यक्ष कौशिक शाह, उरण शहर युवा अध्यक्ष निलेश पाटील, महिला अध्यक्ष संपूर्णा थळी, तालुका महिला मोर्चा अध्यक्ष राणी म्हात्रे, खोपटा सरपंच विशाखा ठाकूर, उरण पूर्व विभाग अध्यक्ष शशि पाटील, उरण तालुका सरचिटणीस सुनील पाटील, तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, जीवन गावंड, उरण तालुका ग्रामीण मंडळ अध्यक्ष धनेश गावंड, भाजप राजस्थान प्रकोष्ठचे जिल्हाध्यक्ष पुखराज सुथार, उरण शहर मंडळ अध्यक्ष प्रसाद भोईर, चाणजे विभाग अध्यक्ष जितेंद्र घरत, सीमा घरत, मनन पटेल, हितेश शाह, मनोहर सहतीया, अजित भिंडे, वैभव म्हात्रे, समीर म्हात्रे, दिनेश पाटील, नरेंद्र तांडेल, स्वप्नील मयेकर, राजेश गावडे, केदार आसरकर, सतेज पाटील, दिनेश ठक्कर, नवीन राजपाल,सुशांत पाटील, अरुणा म्हात्रे, निर्मला घरत, जान्हवी पंडित, समिता ठाकूर, दत्ता ठाकूर, महेश म्हात्रे, जयेश खारपाटील, सामीर डुंगिकर, प्रतिक गोंधळी, प्रमोद म्हात्रे,कुणाल शिसोदिया, पुरोशोताम सेवक भारत घरत आदी उपस्थित होते.

# रायगड जिल्ह्यात संविधान दिन उत्साहात

## विविध कार्यक्रम; उपस्थितांकडून जागर



### नळेफोडी

**माणगाव : बातमीदार**

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नळेफोडी व अंगणवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने 'संविधान दिन' शाळेच्या प्रांगणात विविध उपक्रम राबवून उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करून करण्यात आली.

कार्यक्रमास उपस्थित सर्व ग्रामस्थ व विद्यार्थी वर्ग यांना संविधानाची मूळ उद्देशिका वाटप करण्यात आली. घटनेचा आरसाच नव्हे तर घटनेचा सार असणाऱ्या संविधानातील उद्देश पत्रिकेत असणाऱ्या सर्व ७४ शब्दांचा घटनात्मक अर्थ शाळेचे मुख्याध्यापक अनिल नाचपले यांनी आपल्या ओघवत्या शैलीत सर्वांना समजावून सांगितला. घर घर संविधान उपक्रमांतर्गत दररोज चालणाऱ्या उपक्रमाची फलनिष्पत्ती जाणून घेण्यासाठी सुजाण नागरिक मंच अंतर्गत स्थापित संविधान गुणगौरव समिती अंतर्गत होणारी संविधान गुणगौरव परीक्षा २०२५ लहान गटाची परीक्षा सर्व विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे दिली.

संविधानाला अपेक्षित असलेली सर्व मूल्ये अंगी बाळगून राष्ट्राची एकता आणि एकात्मता वाढावी यासाठी वचनबद्ध राहू अशा प्रकारचा संकल्प उपस्थित सर्वांनी बोलून दाखवला.संविधानाची प्रास्ताविका अर्थात उद्देशिका यांचे सामूहिक वाचन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. सभेला शाळेचे मुख्याध्यापक अनिल नाचपले, अंगणवाडी सेविका सुचिता जयवंत महादे, मदतनीस अनविशा अविनाश तुपट, सोनू गणपत तुपट, हरिचंद्र महादेव लोखंडे, मालती महादेव भुवड, लक्ष्मी शिवाजी लोखंडे, अर्चना हरिश्चंद्र महादे, निल अविनाश तुपट, देवयानी गोपीचंद हीलम, संस्कृती प्रमिक भावे, श्रावणी संतोष लोखंडे, तुपट गंधर्व मच्छिंद्र महादेव विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

### आरसीएफ थळ

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड (आरसीएफ), थळ युनिटमध्ये बुधवारी (दि. २६) संविधान दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला थळ युनिटमधील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या विशेष प्रसंगी आरसीएफ थळ प्रकल्पाचे कार्यकारी संचालक नितीन हिरडे यांच्या हस्ते प्रशासकीय इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळ भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेच्या भित्तीचित्राचे अनावरण करण्यात आले. आरसीएफ एससी एसटी एम्प्लॉईज वेलफेर असोसिएशनच्या पुढाकारातून भित्तीचित्र काण्यात आले आहे.

या वेळी भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेचे सामूहिक वाचन करण्यात आले. उपस्थित कर्मचार्यांनी न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या संविधानिक मूल्यांचे काटेकोर पालन करण्याची शपथ घेतली.

संविधानाचे महत्त्व, त्याचा इतिहास, भारतीय लोकशाहीची पायाभरणी, मूलभूत अधिकार आणि कर्तव्ये यावर आधारित हर्षवर्धन वाघमारे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुधीर पेदोर यांनी केले.




## पनवेल महानगरपालिका
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

दुरध्वनी क्र. : ०२२-२७४५८०४०/४१/४२.
ईमेल: panvelcorporation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporation.com

**अंदाजपत्रक बनविणेकामी**

| अनु.क्र. | प्रकरण क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १ | प्रकरण/ पमपा/मातंवि/२६२५/प्र.क्र. ०१/४३३/२०२५ | पनवेल महानगरपालिकेकरिता नवीन संकेतस्थळ विकसित, देखभाल दुरुस्ती करणेबाबत. |

या बाजारभावाबाबतची माहिती वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात येत आहे. सदरबाबतची दरपत्रके दि. २८/११/२०२५ ते दि. ०४/१२/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजे पर्यंत माहिती व तंत्रज्ञान विभाग, पनवेल महानगरपालिका येथे सादर करण्यात यावी. सदर कामाबाबतची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागात प्राप्त होईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**जा.क्र :-पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. ६३४/६५८/२०२५**
**दिनांक :- २७/११/२०२५**

**सही/-**
**उप आयुक्त (मातंवि)**
**पनवेल महानगरपालिका**




### पालीवाला महाविद्यालय

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या शेठ ज. नौ. पालीवाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुधाकर लहूपचांग यांच्या मार्गदर्शनाने व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून भारतीय संविधान दिन उत्साहात साजरा झाला. या वेळी प्रमुख वक्ते म्हणुन बोलताना महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागाच्या प्राध्यापिका रुक्सार महाडकर यांनी संविधानाचे महत्व उपस्थितांना सांगितले.

या वेळी महाविद्यालयातील उपस्थित प्राध्यापक, प्राधापकेत्तर कर्मचारी यांनी भारताचे संविधानच्या उद्धेशीकेचे सामूहिक वाचन केले. या कार्यक्रमाचे अतिशय सविस्तर आणि अभ्यासपूर्व प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना चे कार्यक्रम अधिकारी तथा अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. अनिल झेंडे यांनी केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख प्रा.यू. बी.इनामदार यांनी भूषवले. यावेळी इतिहास विभाग प्रमुख प्रा. अंकुश सोहनी, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. स्नेहल बेलवलकर, भूगोल विभाग प्रमुख तथा रासेयोचे कार्यक्रम अधिकारी एस. ए.पाटील, परीक्षा विभाग प्रमुख प्रा. एन एन पाटील, प्रा.एस एस खैरनार, वाणिज्य विभागाचे प्रा. संतोष भोईर, प्रा. विशाखा मानकामे, प्रा.सरिता देशमुख, प्रा. संदेश गावडे, प्रा.भक्ती साजेकर, प्रा. श्रद्धा भोईर, प्रा.दीपाली बांगारे, प्रा. हर्षिता घोसाळकर, प्रा.महेश राहीन्ज, प्रा. मधुजीत नायकवडी तसेच प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन तृतीय वर्ष वाणिज्य वर्गातील सुजल म्हात्रे व आभार प्रदर्शन ग्रंथालय प्रमुख तथा राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी एल.बी. उके यांनी केले.


**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend22 / 25-26 RFX 7000038258 | SITC, 22kV feeder for M/s BPCL plant Rasayani POL & BOT plants at 220kV Apta S/Stn under EHV (O&M) Circle, Panvel. | Rs. 37,35,608.22 |

EMD 1% of estimated cost. **Tender Fee : Rs. 500/- + GST Submission of bids from 27.11.2025 to 12.12.2025 up to 11:00 hrs, Opening date:- 12.12.2025 @ 11:30 Hrs.**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** The Executive Engineer(Adm) Mob. No. 8412050202
E-mail ID: **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**



**MAHAVITARAN**

**Tender Notice**

Following Tenders are invited from Eligible Bidders by E-tendering Process under Goregaon Division under Pen Circle Raigad District. The Details are as below-

| Sr. No. | Tender No. | Nature of Work | Estimated Cost (in Lakhs) | Amount of EMD (in Rs.) | Tender Cost Fee (in Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | EE/ GRN/ e-Tender/ T-11 / 2025-26 | Work Contract for Repairing and Maintenance work of Three Phase Transformer Distribution Boxes of various capacity at site and its allied works on "Turnkey basis under Goregaon Division (As per MSEDCL specification) | 25.00 | 25,000/- | 2500+18 % GST= 2950/- |

The Tender Documents are available on MSEDCL Official Website http://etender.mahadiscom.in/ & can be downloaded from Dt. 28.11.2025 to Dt. 07.12.2025. Submission of Bid is up to Dt. 08.12.2025 till 23.55 Hrs. The Bidders are requested to get registered for E-tendering Procedure. Contact Person- Addl. Executive Engineer Tel No. 9029135601. M.S.E.D.Co.Ltd. Chinchavali, Goregaon, Tal: Mangaon Dist.-Raigad-402103.

**PRO no. 267** **Executive Engineer, Goregaon Division.**




### मुरुड

**मुरुड : प्रतिनिधी**

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक मुरुड व संविधान जागर अभियान अंतर्गत तालुकास्तरीय २६ नोव्हेंबर संविधान दिन डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक मुरूड येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमांमध्ये तथागत गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार वाहण्यात आले व बुद्ध वंदना करून अभिवादन करण्यात आले तसेच संविधान उद्देशिका पत्रिकेचे वाचन करण्यात आले. हा कार्यक्रम अशोक जाधव यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडण्यात आला.

गीताच्या माध्यमातून आपले संविधानाविषयी विचार मांडले, व संविधान जागर अभियानाची माहिती देण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष अशोक जाधव, कार्यक्रमाचे सचिव धर्मेश मोरे, प्रमुख वक्ते ॲड. बबन शिंदे, समतादूत वैशाली खरपडे-पेरवे, नरेंद्र जाधव, जिवीन मोरे, लताताई दाभने व इतर मान्यवर व समाज बांधव उपस्थित होते.


**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड यांचे कार्यालय**

कॉंग्रेस भवन, तळ मजला महर्षि कर्वे रोड, ता. अलिबाग, जि. रायगड
दुरध्वनी क्रमांक फॅक्स क्र. ०२१४१-२२२०१३
ई-मेल ddr_rgd@rediffmail.com

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस**

महालक्ष्मी गार्डन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. म.स.नं.३६, उसर्ली खुर्द, पनवेल ता. पनवेल जि.रायगड यांनी गैरअर्जदार एम. के. असोसिएट भागीदार श्री शाबाज हानिफ शेख व हजरा हनिफ शेख इमारती विकासक तथा भागीदार गॅलेक्सी डेव्हलपर्स ४०१, नूर को-ऑप. हौसींग सोसा. लि. यारी रोड, वर्सोवा अंधेरी (प.) ४०००६१, मे. रामयोग एन्टरप्रायझेस तर्फे भागीदार रामेश देवजी गजोरा, महेंद्र अण्णा पवार कसाबलंका को-ऑप. हौसींग सोसायटी लि. शॉप नं.१४,१५ व १६, प्लॉट नं.८५, सेक्टर ३, कोपर खैरणे, नवी मुंबई, ४) श्री अरुण नाना गवते, श्रीम जनाबाई नाना गवते ६) श्री जगदीश नाना गवते ४ ते ६ गवते वाडी, पोस्ट दिघे, ता.ठाणे जि.ठाणे यांचेविरुध्द महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११(३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करुन मिळणे बाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**
**पनवेल जि. रायगड येथील गट क्र. व उपविभाग ३६**
**क्षेत्रफळ २२०.०० चौ.मी.**

गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांच नोंटीस पाकीट लेफट विदाउट इन्स्ट्रक्शन असा पोस्टचा शेरा घेवून परत आले आहे. उर्वरित गैरअर्जदार यांना नोटीस बजावणी झाली असून त्यांनी वकीलपत्र दाखल केले आहे. सबब या जाहिर नोटीस अन्वये सर्व गैरअर्जदाराना कळविणेत येते की, त्यांचे म्हणणे दाखल करणेसाठी त्यांनी दि.१८.१२.२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता विहित रितीने निम्नस्वाक्षरीकार यांचे समोर उपस्थित राहून त्यांचे म्हणणे मांडावे. तसेच वरील मिळकती बाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावीत कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे वर नमूद दिवशी उपस्थित राहून मांडावे. यात कसूर झाल्यास त्यांचे काहीही म्हणणे नाही असा निष्कर्ष नोंदवून त्यांचे गैरहजेरीत एकतर्फी कामकाज करुन उचित आदेश पारीत करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**ठिकाण : अलिबाग**
**दिनांक :- २७/११/२०२५**

**सही/-**
**(प्र.का.जगताप)**
**सशम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, रायगड अलिबाग**



## 🏛 महाराष्ट्र शासन
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, अलिबाग**
**सा.बां. विभाग, अलिबाग पिन कोड ४०२ २०१**

**ई-मेल पत्ता:- alibag.ee@mahapwd.com दुरध्वनी/फॅक्स क्रमांक: (०२१४१) २२२०८४/२२५०९६**

**ई-निविदा सूचना क्र.१९ सन २०२५-२०२६**

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून सक्षम कंत्राटदारांकडून नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही

| Sr. No. | Name of Work | Amount |
|---|---|---|
| 1 | Repairs & maintenance to Falyan Wave Jambhulpada Navghar Thanale Nadsur Bharje Bharjewadi road MDR-38 km 0/00 to 38/800 Tal Sudhagad, Dist Raigad | 14,81,524/- |
| 2 | Annual maintenance & Repairs to Udhar Kumbharghar Mangaon Chandargon Hatond Gondav to NH 548 (A) road MDR-40 Tal Sudhagad, Dist Raigad | 25,39,360/- |
| 3 | Annual maintenance to NH-66D to Sapoli Talvali Hetvane New Vasahat Saterewadi Bhormal Mahalmirya Dongar (Chandepatti) Pachagani road MDR 130 km 0/00 to 12/00 Tal Pen, Dist Raigad | 16,92,064/- |
| 4 | Annual maintenance to Pen Tarankhop Ramraj Dhavansar Belvade (Khurd) Mungoshi Dargawadi Balavali to Chunabhatti road MDR-129 km 0/00 to 13/500 Tal: Pen, Dist: Raigad | 16,90,271/- |
| 5 | Annual maintenance to Poynad Usar Bhadane SH 90 road 0/00 to 27/600 Tal Alibag, Dist Raigad | 10,01,327/- |
| 6 | Annual maintenance & Repairs to Murud Shighre Garambi road MDR 53 km 0/00 to 15/00 Tal Murud, Dist Raigad | 19,36,841/- |
| 7 | Annual maintenance & Repairs to Murud Ekdara Rajpuri Khokari road MDR-55 at km 0/00 to 6/400 Tal Murud, Dist Raigad | 14,37,473/- |
| 8 | Annual maintenance & Repairs to Bordi Thane Ulva Rewas Reddi road (Part Murud to Agardanda) MSH-4 km 310/150 to 319/545 Tal Murud. Dist Raigad | 27,99,357/- |
| 9 | Annual maintenance on A) Vashi Vadhav Kaleshri road MDR-23 km 0/00 to 8/450 B) Vakrul Varavane Tilore road MDR -26 km 0/00 to 8/500 C) Nigade Pabal Kondavi road MDR-24 km 0/00 to 26/600, Tal Pen, Dist Raigad | 21,16,070/- |
| 10 | Annual maintenance on A) Hamrapur Dadar Vasheni road MDR-27 km 0/00 to 11/300, B) Johe Rave Kasarbhat road MDR 11 Km 0/00 to 6/500, C) Savroli Kharpada road SH-104 km 19/800 to 29/00 Tal Pen, Dist Raigad | 17,13,429/- |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी** :- दिनांक २८.११.२०२५ (स.१०.००) ते दिनांक ५.१२.२०२५ (सं.१८.००)
**ई-निविदा उघडणे** :- दिनांक ८.१२.२०२५ (दु.३.०० वा.) (कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग आलिबाग)

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.com
२. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग कार्यालयातील सूचना फलक.

**जा.क्र./ सा.बां./अवि/निविदा/ ५२१०/२०२५**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. विभाग, अलिबाग-४०२ २०१**
**दिनांक :- २५/११/२०२५**

**आरओसी - २०२५-२६/क्र.५/सी ४२४४**

**सही/-**
**(एम एम धायतकड)**
कार्यकारी अभियंता,
सा.बां. विभाग, अलिबाग,
जि.रायगड


### मोरे महिला महाविद्यालय

**रोहे : प्रतिनिधी**

एम बी मोरे फाउंडेशनचे सौ वरदा सुनील तटकरे कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, धाटाव- रोहा येथील राष्ट्रीय सेवा योजना (एनएनएस) युनिटतर्फे बुधवारी २६ नव्हें. रोजी भारतीय संविधानाला ७५ वर्ष पूर्ण झाल्याचे औचित्य साधून 'घर घर संविधान' या उपक्रमाचे आयोजन केले.

संस्थेच्या कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा रोहन पाटील यांनी भारतीय संविधानाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण होण्यासाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित केली.

संविधान अमृतमहोत्सवा निमित्त 'घर घर संविधान' हा उपक्रम २६ नोव्हें २०२५ ते २६ जाने २०२६ पर्यंत आहे. मोरे महिला महाविद्यालयाच्या एनएनएस यूनिटमार्फत या उपक्रमाचे नियोजन एनएनएस कार्यक्रम अधिकारी प्रा ममता बिंद यांनी केले आहे.




**जाहीर नोटीस**

**उप विभागीय अधिकारी पनवेल उपविभाग पनवेल यांच्या न्यायालयात**

On Admission आरटीएस अपिल क्र...२०२५

व्हॅल्युएबल प्रॉपर्टीन प्रा. लि. तर्फअधिकृत
स्वाक्षरी कर्ता श्री. विपीन दोशी
रा. शगुफ को. ऑप. हौ. सोसा, प्लॉट नं. ५अ,
सीवुड, नेरुळ, नवी मुंबई .....वादी

**विरुध्द**

१. सखाराम गोसावी पाटील, रा. शिवकर, ता. पनवेल, जि. रायगड
२. सिताराम गोसावी पाटील, ३. पांडुरंग गोसावी पाटील
४. केशव गोसावी पाटील, ५. श्रीमती. काळुबाई प्रभू ढवळे
६. मथुरा सखाराम बागडे, ७. तुकाराम काशिनाथ ढवळे
८. शिला जोमा पाटील, ९. सारीका जोमा पाटील
क्र. २ ते ९ रा. शिवकर, ता. पनवेल, जि. रायगड
क्र. २ ते ९ तर्फे अखत्यारी श्री. संजय दादू बैले
रा. सिध्दी विनायक को. ऑ.हो. सो. चाळ नं.
२. रुम नं.१, भगवान नगर, बेतूरकर पाडा, कल्याण पूर्व,
ता. कल्याण ४२१३०१, जि. ठाणे ..... प्रतिवादी
१०. तलाठी व मंडळ अधिकारी मोहो, ता. पनवेल, जि. रायगड

तमाम जनतेस तसेच सामनेवाले यांना या नोटीशीव्दारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार मौजे शिवकर, ता. पनवेल, जि. रायगड येथिल फेरफार नोंद क्र. २७७० व तहसिलदार पनवेल यांचेकडील तक्रार केस क्र. १०५/२०२१ दिनांक २७/०१/२०२३ चे विरुध्द अर्जदार यांनी या न्यायालयात प्रस्तुतचे अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यांत आलेल्या आहेत प्रस्तूत अपिलाच्या सुनावणीकामी सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी हो दिनांक ०८/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता निश्चित करण्यांत आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीव्दारे सामनेवाले यांनी तसेच वरील जमिन मिळकतीशी संबंधित असलेल्या व्यक्तीनी २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कार्यालय पनवेल, जि. रायगड येथे समक्ष येऊन आवश्यकत्या सबळ कागदोपत्री पुराव्यासह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे- शिवकर, ता. पनवेल, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| ८४ | २ | ०.२१.५० पैकी ०.१८.४० | २.१२ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक :- २१/११/२०२५**

(शिक्का)

**सही/-**
**उप विभागीय अधिकारी पनवेल**
**उपविभाग पनवेल**



**केशवस्मृति नागरी सहकारी पतपेढी म. पनवेल**
ऑफिस १०२, १०३ आदित्य विहार को. हौ. सो लि महात्मा फुले रोड
जुना पोस्ट ऑफिस जवळ पनवेल ४१०२०६ मो. ८६५७००१८४१

**जाहीर नोटीस**

या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील नमुद केलेल्या कर्जदारांनी केशवस्मृति पतसंस्थेकडून सोनेतारण कर्ज घेतले आहे. पतसंस्थेने त्यांना दिलेल्या कर्जाची मुदत संपली असून दिलेल्या मुदतीत नमुद केलेल्या कर्जदारांनी आपली कर्ज रक्कम (मुद्दल + व्याज) पतसंस्थेकडे परत फेड केलेली नाही. वारंवार संपर्क करून तसेच लेखी पत्र पाठवून देखील आपल्या कर्ज रक्कमेची परतफेड करण्यास सदर कर्जदारांनी कसूर केल्याने पतसंस्थेने कर्जासाठी तारण ठेवलेले सोन्याचे दागिने विकुन सर्व कर्ज रक्कमेची वसुली करण्याचे ठरविले आहे.

तरीही ही नोटीस जाहीर झालेल्या दिनांकापासून आठ दिवसाचे आत संबंधित कर्जदारांनी पतसंस्थेकडे संपर्क न साधल्यास पतसंस्थेच्या ताब्यात असलेल्या सोन्याची विक्री करून सदर कर्जाची व्याजासह परतफेड करून घेण्यात येईल याची नोंद घ्यावी

| अनु.क्र. | नाव | येणे रक्कम रू. | शाखा |
|---|---|---|---|
| १ | संजय हरी गुरुजी | १,९७,५५३/- | पनवेल शाखा |
| २ | संजय हरी गुरुजी | ९,१५,०६२/- | पनवेल शाखा |
| ३. | संजय हरी गुरुजी | १,१८,९६४/- | पनवेल शाखा |
| ४. | संजय हरी गुरुजी | १,१८,९६४/- | पनवेल शाखा |
| ५. | नूतन नंदकिशोर धोत्रे | ५,११,४४९/- | पनवेल शाखा |

**दिनांक :- २७/११/२०२५**

**सही/-**
**केशवस्मृति नागरी सहकारी**
**पतपेढी म. पनवेल**

# नवी मुंबई, वडोदरात डब्ल्यूपीएलचा थरार

## चौथ्या हंगामासाठी मैदानांची घोषणा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वूमेन्स प्रीमियर लीग (डब्ल्यूपीएल)च्या चौथ्या हंगामातील सामने ९ जानेवारी ते ५ फेब्रुवारी २०२६दरम्यान खेळविले जाणार आहेत. या हंगामासाठी नवी मुंबईतील डी.वाय. पाटील स्टेडियम आणि वडोदरा ही दोन ठिकाणे अधिकृतपणे निश्चित करण्यात आली आहेत.

नवी मुंबईच्या मैदानातून आगामी हंगामाची सुरुवात होईल. जवळपास महिनाभर रंगणाऱ्या या स्पर्धेतील अंतिम सामना ५ फेब्रुवारीला वडोदराच्या मैदानात खेळवण्यात येणार आहे. डब्ल्यूपीएलच्या मेगा लिलावात या संदर्भातील मोठी घोषणा करण्यात आली.



डब्ल्यूपीएलच्या पहिला हंगाम २०२३मध्ये खेळवण्यात आला होता. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील मुंबई इंडियन्स संघाने मेग लॅनिंगच्या नेतृत्वाखालील दिल्ली कॅपिटल्स संघाला पराभूत करत पहिलीवहिली स्पर्धा गाजवली होती. २०२४ च्या दुसऱ्या हंगामात स्मृती मानधनाच्या नेतृत्वाखालील रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या संघाने ही स्पर्धा जिंकली. या वेळीही दिल्ली कॅपिटल्सच्या संघाला फायनलमध्ये पराभवाचा सामना करावा लागला. २०२५च्या हंगामात फायनलमध्ये पुन्हा पहिल्या हंगामातील चित्र पहायला मिळाले. मुंबई इंडियन्सच्या संघाने दिल्ली कॅपिटल्सला पराभूत करत दुसऱ्यांदा ही स्पर्धा जिंकली.

आता नव्या हंगामात पुन्हा मुंबई इंडियन्सचा दबदबा पाहायला मिळणार की, नवा चॅम्पियन मिळणार ते पाहण्याजोगे असेल. तीन वेळा फायनल खेळणाऱ्या दिल्ली कॅपिटल्सच्या संघासह यूपी वॉरियर्स आणि गुजरात जाएंट्स संघ अजूनही पहिल्या ट्रॉफीच्या प्रतीक्षेत आहेत. महिला वर्ल्डकप स्पर्धेत भारतीय संघाने ऐतिहासिक कामगिरी करून दाखवली आहे. ज्या मैदानात भारतीय संघाने इतिहास रचला त्याच मैदानातून डब्ल्यूपीच्या आगामी हंगामाला सुरुवात होणार आहे. महिला संघाच्या ऐतिहासिक कामगिरीमुळे आगामी हंगामाला आधीच्या तुलनेत अधिक प्रतिसाद मिळेल, अशी अपेक्षा आहे.

### मेगा लिलावात दीप्ती शर्मा ठरली सर्वात महागडी खेळाडू

महिला प्रीमियर लीग२०२६च्या लिलावात दीप्ती शर्मा सर्वात



महागडी खेळाडू ठरली असून तिला यूपी वॉरियर्सने तब्बल ३.२० कोटी रुपयांत खरेदी करून संघात दाखल केले आहे. स्मृती मंधाना या इतिहासातील सर्वात महागडी खेळाडू आहे. तिला २०२३मध्ये ३.४० कोटी रुपयांमध्ये साइन करण्यात आले. तिने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला २०२४चे विजेतेपद मिळवून दिले आणि ती २०२६साठीही रिटेनर खेळाडू राहणार आहे. यंदाच्या हंगामासाठी दीप्ती खालोखाल अमेलिया केर (मुंबई इंडियन्स) तीन कोटी रुपये, सोफी डिवाइन (गुजरात जायंट्स) दोन कोटी, मेग लॅनिंग (यूपी वॉरियर्स) १.९० कोटी आणि लॉरा वुलफार्ट (दिल्ली कॅपिटल्स) १.१० कोटी या 'टॉप फाईव्ह'मध्ये आहेत.


## खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धा

# महाराष्ट्राला वेटलिफ्टिंग आणि जलतरणात पदके

**बिकानेर : वृत्तसंस्था**

खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेतील पाचव्या पर्वात सलग दुसऱ्या दिवशी महाराष्ट्राच्या खेळाडूंनी पदकांची लयलूट केली. वेटलिफ्टिंगमधील ६५ किलो वजन गटात पुणे विद्यापीठाच्या संजय लोखंडेने सुवर्णपदकाचा करिष्मा घडविला, तर जलतरणात दीपक पाटील, साहिल पवार यांनी रूपेरी यशाला गवसणी घातली.

आहिल्यानगरमधील पाथर्डी तालुक्यातील शेतकरी कुटुंबातील संजय लोखंडे याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करताना ६५ किलो वजन गटात १०७ किलो स्नॅच व १३७ किलो क्लीन ॲण्ड जर्क असे एकूण २४४ किलो वजन उचलून सुवर्णपदक पटकावले.



संजयने अखिल भारतीय आंतरविद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सलग चार वर्ष प्रतिनिधित्व केले असून पदकापासून तो वंचित होता. अखेर खेलो इंडियाच्या मैदानात त्याचे पदकाचे स्वप्न साकार झाले. पाथर्डी बाबुजी आव्हाड महाविद्यालय तो कला शाखेत पदवीत्तर शिक्षण घेत आहे. त्याला महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. डॉ. विजय देशमुख, प्रा. सचिन शिरसाट यांचे मार्गदर्शन लाभले.

जयपूरमध्ये सुरू असलेल्या जलतरण स्पर्धेत पुरुषांच्या २०० मीटर ब्रेस्टस्ट्रोक शर्यतीत मुंबई विद्यापीठाच्या दीपक बाजीराव पाटील याने अचूक तंत्र, दमदार वेग आणि उत्कृष्ट तयारीच्या जोरावर रौप्यपदक पटकावले. दीपकने २:२८.८६ वेळेत शर्यत पूर्ण करीत रूपेरी यशाची कमाई केली.

पुरुषांच्या ५० मी फ्रीस्टाइल प्रकारात पुणे विद्यापीठाच्या साहिल पवारने रौप्यपदकाची कमाई केली. २४.३५ सेकंदात शर्यत पूर्ण करीत खेलो इंडिया स्पर्धेत पदकावर नाव कोरले.

मुंबई विद्यापीठाच्या जलतरणपटूंनी ४ बाय २०० मीटर फ्रीस्टाईल रिले स्पर्धेतही कांस्यपदक जिंकले. रूपक जोशी, अश्विन जयस्वाल, अथर्व म्हात्रे आणि शुभम होले या संघाने जिद्दीच्या जोरावर हे पदक पटकावले. मुंबई विद्यापीठाच्या संघाला डॉ. मनोज वर्मा, डॉ. सागर तोडकर व क्रीडा संचालक डॉ. मनोज रेड्डी यांचे मार्गदर्शन मिळाले आहे.

## कुमार-कुमारी राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

# पिंपरी चिंचवड, पुणे, परभणी, रायगड, जालना, धाराशिव संघांची विजयी घोडदौड

**पुणे : प्रतिनिधी**

४१व्या राज्य अजिंक्यपद निवड चाचणी आणि आमदार चषक कबड्डी स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी पिंपरी चिंचवड, पुणे शहर, परभणी यांनी कुमारी, तर कुमार विभागात रायगड, जालना, उस्मानाबाद यांची विजयी घोडदौड सुरू ठेवली आहे. महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएसशनच्या मान्यतेने पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या यजमानपदाखाली विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, राकेशभाऊ घुले कबड्डी संघ व युवा प्रतिष्ठान यांच्या विद्यमाने स्पर्धा होत आहे.

पिंपरी चिंचवडच्या बोपखेल येथील दिवंगत श्रीरंग धोदाडे क्रीडानगरीत सुरू असलेल्या या कबड्डी स्पर्धेच्या साखळी सामन्यात मुलांमध्ये शुभम बिटके व अथर्व सोनवणे यांच्या जोरदार आक्रमणाच्या जोरावर आणि प्रसाद दिघोळे याने केलेल्या सुरेख पकडींच्या जोरावर यजमान संघाने धाराशिवविरुद्धचा सामना ५७-२९ असा एकतर्फी जिंकला. पिंपरी चिंचवडने पहिल्या डावात दोन लोन लावत ३४-१७ अशी भक्कम आघाडी घेतली होती. ही आघाडी दुसऱ्या डावात ही कायम ठेवत विजय सोपा केला. धाराशिवच्या शुभम जाधव व अथर्व आडे यांनी पहिल्या डावात चांगला खेळ केला, मात्र दुसऱ्या डावात ते कमी पडले आणि संघाला पराभवाचा सामना करावा लागला. जगदिश काळे याने काही चांगल्या पकडी केल्या.

पुणे शहर संघाच्या पियुश भिलारे व धीरज देवरे यांच्या जबरदस्त खेळामुळे सामन्याच्या पहिल्या सत्रात २०-२६ असा पिछाडीवर असूनही जोरदार आक्रमण करून आपल्या संघाला ५१- ३६ असा विजय मिळवून दिला. त्यांना कुणाल हरणेकर व साहिल शिर्के यांनी पकडी करीत विजयात मोलाचा वाटा उचलला. सामन्याच्या सुरुवातीला आक्रमक चढाया करणाऱ्या दिवेश गवळी व साई चौगुले यांनी सामन्यात आघाडी घेतली होती, मात्र त्यांना सामन्याच्या



उत्तरार्धात ही आघाडी टिकविता आली नाही. त्यामुळे पराभवाला सामोरे जावे लागले. समर्थ कासुर्डे व रमेश रायकर यांनी पकडी घेतल्या.

परभणी संघाने जळगाव संघावर ४७-३७ अशी मात करीत आपल्या गटात विजय मिळविला. परभणीच्या बाबुराव जाधव, रमेश गायकवाड यांनी जोरदार हल्ला करीत पहिल्या डावात एक व दुसऱ्या डावात एक लोन लावून आपल्या संघाला विजय मिळवून दिला. वेदांत जाधव व अतुल जाधव, अंकुश भांडे यांनी चांगल्या पकडी केल्या. जळगावच्या जुनेद खाटीक, दिगंबर चौधरी व हर्षल बागुल यांनी काहीसा प्रतिकार केला, तर करण कोळी आणि प्रतिक अवसरमोल यांनी पकडी केल्या.

जालना संघाच्या मोनिका पवार कल्याणी शिंदे यांच्या आक्रमक खेळाच्या जोरावर पहिल्या डावात एक व दुसऱ्या डावात दोन लोन लावत हा सामना ४९-३४ असा जिंकला. मध्यंतराला जालना संघ २०-२१ असा एक गुणांनी पिछाडीवर होता. नंदा नागवे व राणी भुजंग यांनी पकडी घेत विजयात हातभार लावला. नाशिक शहरच्या बिदिशा सोनार व पावनी निकम यांनी चांगला प्रतिकार केला, तर तनुजा धेरिंगे हिने पकडी घेतल्या.

धाराशिव संघाने मुंबई शहर पूर्व संघावर ३४-२३ असा आपल्या गटात विजय मिळविला. मध्यंतराला उस्मानाबाद संघाकडे २२-११ अशी आघाडी होती. दोन्ही संघ एकमेकांना आजमावत सावध खेळ केला. उस्मानाबादच्या साक्षी मिसाळ हिने पकडी घेतल्या, तर मुंबई शहर पूर्वच्या अन्नु यादवने पकडी केल्या.

### रायगडची धुळे संघावर मात

कुमारी विभागात रायगडने धुळे संघावर ५७-२९ असा मात करीत विजय मिळविला. रायगडच्या अनन्या निर्मल आणि आदिती पानवलकर यांनी जोरदार खेळ करीत सामन्याच्या पूर्वार्धात दोन लोन व उत्तरार्धात दोन लोन लावत विजय मिळविला. मध्यंतराला रायगडकडे ३१-१३ अशी आघाडी होती. त्यांना रिया जोशी व गीतिका म्हात्रे यांनी केलेल्या पकडींची सुरेख साथ मिळाली.

# बीसीसीआयकडून गंभीरला अभय? घाईघाईने निर्णय न घेण्याचे संकेत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

घरच्या मैदानावर जवळपास १२ वर्षांपासून एकही कसोटी मालिका न गमावलेल्या टीम इंडियावर दुसऱ्यांदा पराभवाची नामुष्की ओढवली. भारतीय संघाचा कसोटी इतिहासातील सर्वात मोठा आणि वाईट पराभव झाला. त्यामुळे संघाचा प्रशिक्षक गौतम गंभीर याच्या भविष्याबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित होणे आहे. केवळ गंभीरच नाही तर मुख्य निवडकर्ता अजित आगरकरदेखील टीकेचा धनी होताना दिसत आहेत. याचदरम्यान, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाकडून (बीसीसीआय) एक महत्त्वाची अपडेट येताना दिसत आहे.

गौतम गंभीर कोच झाल्यानंतर भारताला घरच्या मैदानावर न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सलग दोन टेस्ट मालिकांमध्ये क्लीन स्वीप सहन करावा लागला. एका वृत्तानुसार एकाच वर्षात दोन कसोटी मालिका हरण्याची नामुष्की सहन करावी लागल्यानंतरही बीसीसीआय सध्या घाईघाईने कारवाई करण्याची कुठलीही योजना आखत नाहीये. सूत्रांचा हवाला देत या अहवालात म्हटले आहे की, संघ सध्या विविध बदलांतून जात आहे. काही अनुभवी खेळाडू निवृत्त झाले आहेत. काही खेळाडू दुखापतीतून सावरत आहे. या टप्प्यात बोर्ड घाईघाईने कारवाई करण्यास तयार नाही तसेच असा दावाही करण्यात आला आहे की, सध्या खेळाडूंमध्येही कोणतेही बदल करण्याचा बोर्डाचा विचार नाही.

### भविष्यातील योजनांवर चर्चा करणार

गंभीरला जुलै २०२४मध्ये टीम इंडियाचा मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्त करण्यात आले आणि त्याला तीन वर्षांचा कार्यकाळ देण्यात आला, जो २०२७च्या विश्वचषकापर्यंत राहील. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दारूण पराभवानंतर बीसीसीआयचे अधिकारी निवड समिती आणि संघ व्यवस्थापनाशी बोलणार आहेत आणि भविष्यातील योजनांवर चर्चा करतील, असेही सांगितले जात आहे.

# अद्वैत सावंतचे कराटे स्पर्धेत 'रूपेरी' यश

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे सीबीएसई इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील इयत्ता चौथीचा विद्यार्थी अद्वैत संदीप सावंत याने राज्यस्तरीय कराटे चषक स्पर्धेत रौप्यपदक जिंकले. प्रशिक्षक श्रेयस गमरे यांचे मार्गदर्शन त्याला लाभले.



याबद्दल संस्थेचे अध्यक्ष राजीव साबळे, शाळेच्या चेअरमन निकिता साबळे-जैन, ॲड. स्मिता बोंबले, शिपुरकर व वाघरे इंग्रजी माध्यम शाळेचे चेअरमन अरुण पवार, मुख्याध्यापिका निशिगंधा मयेकर आदींनी अभिनंदन केले.

# गुरूकुल ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धांना सुरुवात



## ३२ शाळांनी नोंदविला सहभाग

**चौक : प्रतिनिधी**

श्री स्वामीनारायण गुरुकुल आंतरराष्ट्रीय शाळेत गुरुकुल ऑलिम्पिक २०२५ या भव्य क्रीडा स्पर्धेला सुरुवात झाली आहे. या स्पर्धेत सुमारे ३२ शाळांनी सहभाग नोंदवला असून चार तालुक्यांतील विद्यार्थी विविध क्रीडा प्रकारांत आपले कौशल्य दाखवतील.

स्पर्धेचे उद्घाटन संचालक विश्वमंगलदास स्वामी आणि ब्रम्हस्वरूपदास स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली चौक प्रभारी विशाल पवार, शाळेचे प्राचार्य डॉ. हरिबाबू रेड्डी यांच्या हस्ते झाले. उद्घाटन समारंभाला सामाजिक कार्यकर्ते सुनील गायकवाड, आबासाहेब मोरे, शिवाजी भासे, शाळेचे शिक्षक, विद्यार्थी मोठ्या उपस्थित होते.

स्पर्धा तीन दिवस सुरू राहणार असून विजेत्या खेळाडूंची पुढील क्रीडा नामांकनासाठी निवड केली जाणार आहे.

# एकाच मालिकेत दोन मोठे विक्रम करण्याची विराटला संधी

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दोन कसोटी सामन्यांची मालिका संपल्यानंतर आता क्रिकेट चाहत्यांचे लक्ष ३० नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेकडे लागले आहे. या बहुप्रतिक्षित मालिकेत भारताचा स्टार खेळाडू विराट कोहली याला एका मोठ्या विक्रमाला गवसणी घालण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे.

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेनंतर आता किंग कोहली मायदेशात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळायला सज्ज झाला आहे. या मालिकेत चाहत्यांच्या नजरा पुन्हा एकदा विराट आणि रोहित शर्मा यांच्या कामगिरीकडे लागलेल्या आहेत. विराटचा एकदिवसीय क्रिकेटमधील दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा रेकॉर्ड नेहमीच प्रभावी राहिला आहे. त्याने आतापर्यंत आफ्रिकेविरुद्ध ३१ एकदिवसीय सामने खेळले आहेत, ज्यात त्याने ६५.३९च्या सरासरीने एकूण १५०४ धावा जमवल्या आहेत. या यादीत तो फक्त महान फलंदाज



सचिन तेंडुलकरच्या (२००१ धावा) मागे आहे.

घरच्या मैदानावर दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सर्वाधिक धावा करणाऱ्या भारतीय खेळाडूंच्या यादीत विराट सध्या तिसऱ्या क्रमांकावर आहे. त्याने ४३५ धावा, तर राहुल द्रविडने ४४० धावा केल्या आहेत.

विराट कोहलीला राहुल द्रविडला मागे टाकण्यासाठी फक्त सहा धावा करण्याची गरज आहे. जर तो या मालिकेत सहा किंवा त्याहून अधिक धावा करण्यात यशस्वी ठरला, तर तो द्रविडला मागे टाकून घरच्या मैदानावर द. आफ्रिकेविरुद्ध सर्वाधिक धावा करणारा भारतीय फलंदाज बनेल.

इतकेच नाही तर विराटकडे मास्टर-ब्लास्टर सचिन तेंडुलकरला आणखी एका विक्रमात मागे टाकण्याची संधी आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतके करण्याच्या बाबतीत विराट आणि सचिन सध्या संयुक्तपणे पहिल्या स्थानावर आहेत. दोघांच्या नावावरही दक्षिण आफ्रिकेविरुद्ध प्रत्येकी पाच शतके आहेत. जर विराटने आगामी तीन सामन्यांच्या मालिकेत एक जरी शतक ठोकले, तर तो सचिनला मागे टाकून दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सर्वाधिक एकदिवसीय शतके करणारा एकमेव भारतीय खेळाडू ठरेल.

# टीम इंडियाचा पुढील कसोटी सामना तब्बल नऊ महिन्यांनी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेने भारताचा २-० असा पराभव करत व्हाईटवॉश दिला. मायदेशात झालेल्या हा पराभवाचा डाग पुसून काढण्यासाठी संघाला नवीन वर्षाची वाट पहावी लागणार आहे.

टीम इंडियाच्या डब्ल्यूटीसीची फायनल खेळण्याच्या स्वप्नाला मोठा धक्का बसला आहे, कारण द. आफ्रिकेविरूद्धची कसोटी मालिका हरल्यामुळे टीम इंडिया ही पाचव्या स्थानावर घसरली आहे. आता टीम इंडिया आफ्रिकेसोबतच वनडे आणि टी-२० मालिका खेळणार आहे. यानंतर भारतीय संघ न्यूझीलंडविरूद्ध मर्यादित षटकांच्या सामन्यांची मालिका खेळेल. ही मालिका संपली की टीम इंडिया टी-२० वर्ल्डकप २०२६च्या तयारीला लागेल. हा वर्ल्डकप फेब्रुवारी महिन्यात होणार आहे. यानंतर भारतीय संघ आपली पुढची कसोटी मालिका ही थेट आजपासून जवळपास नऊ महिन्यांनी म्हणजे २०२६च्या ऑगस्ट महिन्यात खेळणार आहे. भारत या वेळी श्रीलंकेसोबत दोन कसोटी सामन्यांची मालिका खेळेल.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com